
# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक आठवा

क्षणोक्षणी आणि पानोपानी
अंगावर काटा उभा करणारी
अपूर्व शिवगाथा !
दीर्घ अभ्यासाच्या
आणि दक्षिणेतल्या
दऱ्याडोंगरांच्या भटकंतीनंतर
कादंबरीकार विश्वास पाटील
यांनी आपल्या 'महासम्राट'
या कादंबरीत डोळ्यांसमोर
साक्षात उभी केली आहे.











▲

आजच्या ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या पश्चिमेचा प्रचंड विस्ताराचा हा माहुलीचा किल्ला. हाच किल्ला महापिता शहाजीराजांनी दिल्लीचा बादशहा शहाजहान याच्या विरोधात १६३५ मध्ये नऊ महिने झुंजवला होता. इथूनच दिल्लीकर बादशहाने शहाजीराजांना एका करारानुसार विजापुराकडे हद्‌पार केले. वीस वर्षांमागे प्रस्तुत लेखकाने या किल्ल्यावर व आसपासच्या डोंगरदऱ्यांतून प्रथम भटकंती केली होती, तेव्हाची ही छायाचित्रे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ ऑगस्ट २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक आठवा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य :**
पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


– *अनुक्रमणिका* –


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **एक एक पान घडताना...** | **१०** |
| **साहित्यवार्ता** | **१६** |
| **भातवडीचे धगधगते रणमैदान** | **१८** |
| **दिनविशेष** | **६२** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

## पांजा संथालीच्या...

पांजा म्हणजे संथाली भाषेत 'शोध' किंवा 'पाऊलखुणा' या आदिवासी भाषेची अचानक आठवण येण्याचं कारण म्हणजे आपल्या नवनिर्वाचित राष्ट्रपती. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी पूर्ण होता होता भारताला लाभलं झारखंडच्या दरीडोंगरातून आपली वाट शोधत राजपथापर्यंत आलेलं नवं नाव. पहिल्या आदिवासी राष्ट्रपती म्हणून नेमणूक झालेल्या द्रौपदी मुर्मू ह्यांनी सर्वात कमी वय आणि स्वतंत्र भारतात जन्मलेल्या पहिल्या राष्ट्रपती म्हणून वेगळेपण तर मिळवलंच पण त्या ज्या भागातून येतात किंवा ज्या भाषेचं प्रतिनिधित्व करतात त्या संथाल भाषेविषयी अधिक जाणून घेताना आदिवासी समाज, तिथली भाषा आणि स्वतंत्रपूर्व भारताच्या अनेक पांजा अर्थात अनेक पाऊलखुणा सापडत गेल्या.

जगातील सर्वात जुन्या भाषांपैकी एक, पूर्व भारतातील एक प्रमुख आदिम जमात असलेली संथाळ. जिचा उल्लेख संथाळांच्या साहित्यात संथाळ, सांथाळ, संताळ, सावंतार, सावंताळ अशा अनेक नावांनी आहे. असं मानतात की, संथाळांच्या पूर्वजांनी राम-लक्ष्मणांना सहकार्य केलं होतं. त्यामुळे हा समुदाय थेट नातं सांगतो ते रामायणाशी. त्यांच्या मूलस्थाना-विषयी तशी निश्चित माहिती कुठंच नाही पण गंगेच्या खोऱ्यातली पहिली वस्ती, त्यानंतर झारखंडमधील छोटा नागपूर या पठारी-जंगली प्रदेशात केलेलं स्थलांतर

आणि इंग्रजांच्या जंगलतोडीमुळं ईशान्येकडे त्यांचं बस्तान सरकल्याचं लक्षात येतं. संथालांकडे असलेला बऱ्यापैकी जमीनजुमला त्यावेळी इंग्रज आणि स्थानिक सावकारांनी बळकावला. परिणामी १८५४ मध्ये बंड झालं आणि या उद्रेकाचा परिणाम म्हणून भूदासपद्धती बंद झाली. स्वतंत्र संथाळ परगणा निर्माण झाला. त्यानुसार प्रत्येक खेड्यात मांझी म्हणजे पाटील अधिकारी नेमले. याच सुमारास आसाम-बंगालमध्ये सुरु झालेल्या चहाच्या मळ्यात मजूर म्हणून संथालांची भरती केली. तसा त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती पण त्यांनी शिकार, मच्छीमारी, गुरे पाळणं, खाणीतून काम करणं ही कामंदेखील स्वीकारली. आसनसोलजवळच्या किंवा जमशेटपूरमधील कोळशाच्या खाणीतून काम करणारे हेच संथाली आज दगडी कोळसा फोडण्यात माहीर आहेत.

साधारणत: मध्यम चणीचे, कृष्णवर्णीय, बांधेसूद अशी शारीरिक वैशिष्टये असणारे संथाली खेडी किंवा जंगलात झोपड्या करून राहतात. त्यांच्या पितृसत्ताक जीवनपद्धतीत पाऊस पाडणारा, धान्य निर्मिती करणारा, आकाशी राहणारा आणि अवज्ञा झाल्यास कोपणारा असा ‘ठाकूर’ हा सर्वश्रेष्ठ देव आहे. एकोणिसाव्या शतकात मजुरीच्या निमित्ताने नागरी वस्तीशी संपर्क आलेल्या ह्या समजात हळूहळू हिंदूंचे देव, रीतिरिवाज, पोशाख यांचं अनुकरण वाढलं. नियमित स्नान, सांजवात आणि सायंप्रार्थना वाढू लागल्या. शाकाहारासोबतच शिक्षणाचाही प्रसार विस्तारला. आत्मोन्नतीच्या मार्गाने वाटचाल करत पुढे निघालेल्या संथाळांच्या प्रदेशात रूग्णालये, दवाखाने यांबरोबरच प्राथमिक, माध्यमिक विद्यालये व महाविद्यालये निघाली. अलीकडे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इ. क्षेत्रांतली प्रगती लोकसभा, विधानसभा ते राष्ट्रपदीपदापर्यंत पोचलेली आपण बघतच आहोत.

संथाळी बोलीच्या पाऊलखुणा इतिहासात दूरवर पंधराव्या शतकापासून दिसून येतात. पण तिला लिखित रूप यायला तब्बल चारशे वर्षं लागली. पंडित रघुनाथ मुर्मू यांनी ओलीचिकी लिपीत लेखन करून संथाळीला खरी ‘स्वभाषा’ बनवली. आता संथाली विविध प्रदेशात विखुरल्याने त्या त्या प्रदेशातील भाषेच्या लिपीतून लिहिताना दिसून येते. १५ नोव्हेंबर, २००० रोजी झारखंडला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता मिळाली. हिंदी या राज्याची पहिली राजभाषा झाली. पण ६ सप्टेंबर, २०११च्या निर्णयानुसार काही प्रादेशिक व आदिवासी भाषांना दुसऱ्या राजभाषेचा दर्जा देण्यात आला.

त्यानुसार संथाळी या आदिवासी भाषेसह नागपुरी, पंचपरगनिया, कोऱ्हा, आणि कुरमाली या प्रांतिक भाषांना राजभाषेचा दर्जा मिळाला. अशातच अल्पसंख्याक भाषिक राज्य म्हणून झारखंडला मिळालेल्या विशेष मान्यतेमुळे संथाळी भाषेचा विकास वेगाने झाला. घटनेच्या आठव्या परिशिष्टात राष्ट्रीय भाषा म्हणून संथाली गणली जाते. संथाळीत आता आय.ए.एस. होता येते. सोबतच साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्टने दिलेल्या मान्यतेमुळे राष्ट्रीय दर्जाही प्राप्त झाला असून अनुवादाच्या क्षेत्रातही संथाली आपलं नाणं खणखणीत वाजवताना दिसते.

आज संथालीचा सगळा प्रवास वस्ती करून राहणाऱ्या समुदायाची बोली ते साहित्य अकादमीवर नाव कोरणारी राष्ट्रीय भाषा असा दिसून येतो. भाषा माणसांच्या प्रयत्नांनी तर समृद्ध होतेच पण तिचे असे वेगळे आयुष्यमान देखील असते. भाषेप्रमाणेच इतिहासाची पायवाटही सारखीच आहे. त्यांच्यापर्यंत पोहचायचं असेल तर योग्य अभ्यास, तर्कशुद्ध मांडणी आणि तितक्याच सकस लेखणीतून उतरलेल्या लेखनाचा मागोवा घेणं जास्त गरजेचं आहे.

छत्रपती शिवरायांचा इतिहास समजावून सांगणं हेही शिवधनुष्य पेलण्यासारखंच तर आहे. आणि हे शिवधनुष्य उचललंय महाकादंबरीकार विश्वास पाटील यांनी. इतिहासातल्या अनेक घटना आपल्या समृद्ध लेखणीने जिवंत करणाऱ्या विश्वास पाटील यांनी पुन्हा एकदा 'महासम्राट' या त्यांच्या बहुचर्चित कादंबरीमालेतील 'झंझावात' या पहिल्या खंडातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर नव्याने प्रकाशझोत टाकला गेलाय. आशा आहे की, या कादंबरीमालेच्या रूपाने शिवरायांचा इतिहास आणि महती अधिक योग्य पद्धतीने वाचकांपर्यंत पोचेल आणि कादंबरीला रसिकवाचकांचे उदंड प्रेम मिळेल.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छपील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा, आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स ॲप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

मेहता बुक सेलर्स



**'मेहता बुक सेलर्स'**ची
जबाबदारी स्वीकारल्याबद्दल
**सौ. शर्मिला शहा** यांचे
**'मेहता पब्लिशिंग हाऊस'** तर्फे

हार्दिक अभिनंदन!

आणि पुढील वाटचालीस

हार्दिक शुभेच्छा!

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

# एक एक पान घडताना...

*– अनिल मेहता*

(सल्लागार मंडळाचे संचालक)



मेहता पब्लिशिंग हाऊसचं नाव केवळ पुणे-कोल्हापूरपर्यंत मर्यादित न राहता देशभर गाजू लागलं. प्रकाशन संस्था मोठी होऊ लागली. अशा महत्त्वाच्या काळात अनिल मेहतांच्या बरोबर होती ती 'टीम मेहता' कोणत्याही संस्थेच्या यशाचं गमक हे त्या संस्थेत काम करणाऱ्या लोकांच्या कामाची पद्धत, शिस्त, प्रामाणिकपणा आणि संस्थाचालक आणि कर्मचाऱ्यांमधील हितसंबंध यात दडलेलं असतं. मेहता प्रकाशनाच्या यशाचं रहस्यदेखील हेच आहे. या नव्या लेखापासून जाणून घेऊया मेहता प्रकाशनाच्या टीमविषयी...

## १२

## 'टीम मेहता'

पुस्तक विक्री व प्रकाशन व्यवसाय यशस्वी होण्यासाठी लागतं ते 'परफेक्ट टीमवर्क'. मी एकटा असतो तर माझा हा व्यवसाय कोल्हापूरपुरता मर्यादित राहिला असता, पण आमच्या टीममुळं मी मेहता पब्लिशिंग हाऊस या मराठी प्रकाशन संस्थेचं नाव पुणे, मुंबई, संपूर्ण महाराष्ट्र, दिल्ली व त्याहीपलीकडं म्हणजे सातासमुद्रापार नेऊ शकलो.

आपल्याकडं व्यावसायिक कल्पकता खूप असतात, पण त्या कल्पना यशस्वी करण्यासाठी तसे सहकारी व सेवकवर्ग असेल तरच आपण आपल्या योग्यतेपर्यंत पोहोचू शकतो. त्या क्षेत्रातले बिझनेस महाराजे बनू शकतो. त्यामुळं माझ्या व्यवसायाचं श्रेय मी माझ्या सहकाऱ्यांनाही देतो. आपल्यासोबत काम करणारा स्टाफ हा सुद्धा तितकाच कल्पक, हुशार व बुद्धिमान असेल, प्रामाणिक असेल तर मग सोन्याहून पिवळंच.

माझ्या दुकानात बऱ्याच मुलांनी कामं केली. मी कामासाठी ज्यांना पण निवडलं, ती सर्व हुशार मुलं होती. त्यातल्या काहींना पुढं चांगल्या नोकऱ्या मिळाल्या व ते काम सोडून गेले. कुणी शाळेचे हेडमास्तर झाले, कुणी कॉलेजचे प्रिन्सिपॉल, कोणी सरकारी अधिकारी. अजूनही ते माझ्या दुकानात येतात. त्यावेळी ते विचारतात, 'साहेब ओळखलंत का?' आणि खरोखरच त्यावेळी माझ्या लक्षात आलेलं नसतं की, हा माणूस आपल्याकडं होता का? ते आपली ओळख सांगायला लागले की, माझ्या ध्यानात येतं की, होय. हा माणूस आपल्याकडं होता. नुकताच एक माणूस येऊन गेला. तो आजऱ्यातील कुठल्यातरी गावी सरपंच आहे. त्यानं मला सांगितलं, की 'मी तुमच्याकडं काम करत होतो.' ही मंडळी आज मोठ्या पदावर आहेत, हे पाहून मला खूप आनंद होतो. ते सांगतात की, तुम्ही नुसते मालक नव्हता तर तुम्ही एका वेगळ्या नजरेनं आमच्याकडं बघत होता. ज्यातून आम्हाला तुमच्याबद्दल व दुकानाबद्दल नेहमीच आपलेपणा वाटायचा.

मला वाटतं, मी माझ्याकडं काम करणाऱ्या कोणालाही कमी लेखत नाही. त्यामुळं या मुलांना माझ्याबद्दल एक आदर असावा. मी या मुलांना समजावून घेतो. त्यांचं काही चुकलं तर त्यांची बाजू ऐकतो. मला ते फार महत्त्वाचं वाटतं. स्टाफमधल्या सगळ्यांना मी अहो-जाहो म्हणण्याचा प्रयत्न करत असतो, त्यामुळं इतर स्टाफही एकमेकांना आहो-जाहो असाच आदरानं उल्लेख करतात. दुकानात कोणाचं काही चुकलं असेल व ती तक्रार माझ्याकडं आली तर माझा स्वभाव असा, की माझ्या कुठल्याही स्टाफच्या चुकीवर पांघरूण घालताना मला जरासुद्धा कमीपणा वाटत नाही. त्याचं कारण असं, की चुका होत असतात. मी त्यांना बोलतो पण लगेच त्यांना धारेवर धरणं

किंवा शिक्षा देणं मला योग्य वाटत नाही. पण मी शिस्तीच्या बाबतीत पहिल्यापासून कडक आहे. अलीकडं वयामुळं थोडा मऊ झालो आहे. हल्लीच्या नव्या मुलांमध्ये मीही त्यांच्याप्रमाणं जुळवून घेतलंय. ती मुलं माझी चेष्टा-मस्करी करतात.

स्टाफची आपण काळजी घेतली तर तेही आपली घेतात. मी मालक व बाकी सगळे नोकर, अशी भावना न ठेवता वागतो, त्यांना मी सहकारी मानतो. स्टाफबरोबरीनं मीही सक्रिय असतो. स्वतः पुस्तक काढून देणे, बिलिंग करणे, बांधून देणे हे सगळं करतो. त्यामुळं स्टाफलाही उत्साह येतो. माझं म्हणणं असतं, की दुकानातील सर्व गोष्टी सर्वांना जमल्या पाहिजेत. कोणी नाही म्हणून अडायला नको.

माझ्या दुकानातील माझे सहकारी सहसा मला सोडून जात नाहीत. माझ्यात व त्यांच्यात जिव्हाळ्याचं नातं आपोआपच तयार होत जातं. मीही त्यांना सोडू शकत नाही. मी अजब पुस्तकालयातून बाहेर पडलो. त्यावेळी माझ्याबरोबर काम करणाऱ्यांपैकी एक होते अमर चौगुले, एक होते भोसले आणि एक होते श्रीपाद नाईक. आणि संगोराम मॅडम. अमर हा मुलगा दहावीही पूर्ण झालेला नव्हता. झाडलोट करण्यासाठी ठेवलेला. पण तो इतका शिकला की हवी ती पुस्तकं पटापट काढून देऊ लागला. अक्षर सुंदर. स्मरणशक्ती तल्लख. पुढं त्याला चांगल्यापैकी महापालिकेत नोकरी मिळाली, त्यामुळं तो सोडून गेला. पण तरीसुद्धा तो ज्या - ज्या वेळी प्रदर्शन असेल किंवा काही अडचणी असेल तर आवर्जून येतो. दिवाळीच्या वेळी येतो. पाडव्याच्या दिवशी आम्हाला पुस्तकं लावण्यासाठी, साफसफाईची मदत करण्यासाठी येतो. इतकी त्याला आजही दुकानाविषयी आपुलकी आहे.

माझं ज्यावेळी पाठीच्या मणक्याचं ऑपरेशन झालं होतं, त्यावेळी मी तीन महिने पुण्यात होतो. तेव्हा माझ्याशिवाय संपूर्ण स्टाफनं दुकान सांभाळलं. तीन महिन्यानंतर मी पुण्यातून गाडीनं कोल्हापूरला निघताना वाहिमला फोन करून सांगितलं, की मी सहा साडेसहाला पोचतोय व साधारणपणे मला पावणेसात वाजले पोहचायला. तर दुकानात सगळा स्टाफ माझी आतुरतेनं वाट पाहत होता. दुकानात जाऊन मी खुर्चीवर बसलो आणि मला हुंदका आला. मी

ढसाढसा रडलो. कारण माझ्या या सहकाऱ्यांनी मी नसताना खरोखरच दुकान उत्तमपणे सांभाळलं होतं. त्याचा तो मला आनंद झाला होता व त्या आनंदापोटी मी खूप रडलो. रोहित त्यावेळी चार-पाच महिने मुक्कामाला माझ्याकडंच होता. अगदी सकाळी उठून काळजी घ्यायचा. माझ्याकडं संजू नावाचा ड्रायव्हर आहे, तोही माझी अत्यंत चांगल्या प्रकारे काळजी घेतो.

या सर्वांना माझ्याकडं जे मोठमोठे लेखक येतात त्याचं अप्रूप असायचं. आपण या मंडळींना इतक्या जवळून पाहतोय, भेटतोय, त्याचं बोलणं आपल्या कानावर पडतंय याचा त्यांना खूप आनंद असे.

दुकान सकाळी नऊ ते रात्री नऊ चालू असतं. दुपारी बंद असं कधीच घडलं नाही. दुपारीही जेवण करून पंधराव्या मिनटात काम पुन्हा सुरू. स्टाफ काम करतोय अन् मी विश्रांती घेतोय असं नाही.

स्टाफमधल्या प्रत्येकाच्या घरची परिस्थिती मला माहीत असते. त्यांना काही अडचण असेल, कोणी आजारी असेल तर मी जातीनं लक्ष घालतो. चौकशी करतो. हवी ती मदत लगेच करतो. वेळेला एखादी रक्कम देणं, सोय करणं. किंवा पैशाअभावी अडू नये याची काळजी घेणं. फी-साठी, आजारपणासाठी, घर बांधण्यासाठी. मुलीला स्कुटर घेण्यासाठी. कोणाची मुलं बोर्डात आली, चांगले मार्कस् मिळाले, जॉब मिळाला की मलाही त्याच्याइतकाच आनंद होतो. कौतुक वाटतं. प्रोत्साहन देतो. त्यांना माझा आधार वाटतो. त्यांच्या मुलांना पण माझा लळा आहे. मध्यंतरी सुधा मूर्तींच्या आमंत्रणावरून एका घरगुती कार्यासाठी बेंगलोरला गेलो, तर आमच्या संगोराम मॅडमच्या मुलानं मला हक्कानं सांगितलं, 'माझ्याकडंच रहायला यायचं.' मीही गेलो.

स्टाफच्या पगाराची एक तारीख कधीच चुकली नाही. वेळेवर प्रत्येकाला पगार मिळणारच. अगदी अंजली हॉस्पिटलला होती, मी पुण्यात होतो, तेव्हाही मी स्वतः पुण्यातून एक दिवस कोल्हापूरला येऊन सर्वांचे ठरलेल्या दिवशी रोख पगार दिले होते. वादावादी झाली व रागावून कोणी दुकान सोडून गेलं असं आजतागायत कधी झालं नाही. सोडून गेली ती गरजेमुळं गेली. एक कौटुंबिक जिव्हाळा आहे. एकमेकांना सगळेच सांभाळून घेतात. स्टाफमधील कोणाचा वाढदिवस असेल तर तो आनंदही आम्ही सगळे साजरा करतो.

माझ्या वाढदिवशी आदल्या रात्री सुनील येतोच, पण स्टाफही तेवढ्याच उत्साहानं वाढदिवस साजरा करतो.

कोल्हापुरात दुकानात दहा-अकरा जण तर पुण्यात तीस-चाळीस जण काम करतात. प्रत्येकाविषयी, सांगणं शक्य नाही. सगळे हिरेच आहेत. पण काहींबद्दल जरा सांगतोच. म्हणजे माझा पुस्तक व्यवसाय मी कसा करतो हे आणखी व्यवस्थित समजेल.

(क्रमश:)

(श्री. अनिल मेहता यांच्या पूर्वलिखित आत्मचरित्रातून)


**नवी संहिता... नवा आशय...**

तथागत

गोतम बुद्ध

**वसंत गायकवाड**

राजपुत्र सिद्धार्थ ते तथागत गोतम बुद्ध या दीर्घ मनोप्रवासाचं प्रत्ययकारी चित्रण




**किंमत : १४००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...


# निर्भय प्रशासन

**किरण बेदी**

अनुवाद

**सुप्रिया वकील**


किरण बेदींच्या निर्भय प्रशासनातून
साकारलेलं समृद्ध पुदुच्चेरीचं स्वप्न




**किंमत : ४४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# राष्ट्रीय शिक्षण धोरण,२०२० - चिकित्सा

**प्रा. डॉ. भालबा विभुते**




भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करू इच्छिणाऱ्या धोरणांवर
अभ्यासपूर्वक भाष्य करणारी पुस्तिका

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## 'महासम्राट' मधून बांधलंय शिवरायांचं 'शब्दस्मारक'

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचा राज्य शासनाचा संकल्प आजतागायत पूर्ण झाला नाही. कदाचित त्यासाठी माझी ताकद कमी पडत आहे. मात्र माझ्याकडे शब्दसंपत्ती भरपूर आहे आणि त्याच संपत्तीतून महाराजांचे 'शब्दस्मारक' उभारण्याचा संकल्प मी येत्या तीन चार वर्षात नक्की पूर्ण करणार आहे. अशा शब्दात महाकादंबरीकार विश्वास पाटील यांनी नागपुरात झालेल्या पत्रकार परिषदेत राज्य शासनाला खडा सवाल केला.

गेल्या महिन्यात 'महासम्राट' या कादंबरीच्या निमित्ताने नागपूर येथे झालेल्या भेटी दरम्यान आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना विश्वास पाटील म्हणाले, ''माझ्या कादंबरीतील नायकाकडे केवळ चरित्र नायक म्हणून मी पाहत नाही तर तो काळ जिवंत व्हावा; त्यांनी उभारलेल्या चळवळीचे आयुष्य त्यामधून उभे राहावे हे दाखविण्याचा मी प्रयत्न केला आहे. १९४०-५० च्या दशकात कादंबरीमाला हा प्रकार होता. चार खंडांची कादंबरी त्यावेळी लिहिली जायची. छत्रपती शिवराय एका परिघात मावणारे नाहीत. अनेकांनी त्यांना संक्षिप्त रुपात चित्रपटात, एका लिखाणात मांडण्याचा प्रयत्न केला. तो मला फारसा पटला नाही. म्हणून त्यांचे विराट आणि आणि खरे रूप मला मांडायचे होते आणि म्हणूनच या कादंबरीमालेचा घाट 'महासम्राट' या नावाने घातला


आहे.' असे विश्वास पाटील म्हणाले. 'झंझावात' या पहिल्या खंडात शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीचा काळ शब्दांकित केला आहे. तर दुसरा भाग 'रणखैंदळ' या नावाने येत आहे. यात शिवाजी महाराजांचा १६६१ ते १६६४ हा चार वर्षांचा काळ शब्दांकित करण्यात आला आहे.


या कादंबरीमालेत एक वेगळेपणा असणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याकाळी भौगोलिक आणि नैसर्गिकततेचा आधार घेऊन अनेक लढाया जिंकल्या याचा उल्लेख यामध्ये केला आहे, असे विश्वास पाटील म्हणतात. १६२४ मध्ये नगरपासून ११ किमी अंतरावर असलेल्या भातवडी येथे गनिमी काव्याचा पहिला यशस्वी प्रयोग शहाजी महाराजांनी केला होता. अफझलखान हा आपला जरी शत्रू असला तरी तो एक करारी पुरुष होता. तो नाविन्यपूर्णतेचा पुरस्कर्ता होता. त्याच्याकडे २० ते ४० हजार जहाजे होती. हा सर्व संदर्भ त्यानिमित्ताने पुढे येणार आहे. या कादंबरीचा 'झंझावात' हा पहिला भाग नुकताच प्रकाशित झाला आहे.


◆


## विश्वास पाटील यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

| | |
|---|---|
| संभाजी | ५७५ |
| नॉट गॉन विथ द विंड | ४९५ |
| क्रांतिसूर्य | १९० |
| बंदा रुपया | ३४५ |
| नागकेशर | ४५० |
| गाभुळलेल्या चंद्रबनात | ३९५ |
| आंबी | २०० |







# भातवडीचे धगधगते रणमैदान



१६२४

शहाजीराजांच्या शौर्याचा पहिला यशस्वी प्रयोग म्हणजे भातवडीची लढाई. स्वराज्याचं खरं स्वप्नं आकाराला आलं ते याचवेळी. गनिमी काव्याचा श्रीगणेशा करणाऱ्या या लढाईने शहाजीराजे भोसले यांचा रुतबा अधिक वाढवला. महासम्राट या कादंबरीमालेतील 'झंझावत' या पहिल्या खंडाचा शुभारंभ करणारी, महाकादंबरीकार विश्वास पाटील यांच्या लेखणीतून जिवंत झालेली ही भातवडीची लढाई अनुभवूया त्यांच्याच शब्दांत

**रात्रीचीच** शहाजीराजे आणि जिजाऊसाहेब दोघांचीही घोडी परांड्याच्या वाटेला लागली होती. त्यांच्या आगेमागे सहासातशे घोडेस्वार दौडत होते. भर दिवसा लखोजीराजांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या झालेल्या त्या निर्घृण हत्येने त्या दोघांचे अवघे जीवन झाकोळून गेल्यासारखे झाले होते.

त्या जोडप्याच्या वाट्याला मुलखावेगळे आयुष्य आले होते. कधी यशगौरवाची उत्तुंग शिखरे तर कधी पराभवाच्या, पीछेहाटीच्या खोल दऱ्या!

त्या ओल्या बोचऱ्या अंधारात घोडी ईर्ष्येने पुढची वाट कापत होती, तेव्हा शहाजीराजांच्या आणि जिजाऊसाहेबांच्या डोळ्यांपुढे गेल्या पाच वर्षांचा वादळी जीवनपट उभा राहत होता.

दिल्लीकर मोगलांच्या घोड्यांना दक्षिणेत दौड करायची, तर मध्ये वाटेत आडवा पट्टा लागायचा तो निजामशाही मुलखाचा. अन् विजापूरकरांनी उत्तरेच्या दिशेने घोडी उधळावयाची ठरवले, तरीही वाटेत औरसचौरस मुलूख लागायचा तो निजामशाहीचाच. बरे हा प्रदेशही थोडाथोडका नव्हता. कोकणातल्या राजापूर ते कुलाब्यापासून ठाणे, कल्याण, माहुलीची रेघ धरत सह्याद्री पार करायचा.

मग बालाघाटाच्या डोंगररांगा कवेत घेऊन पुढे हैदराबाद-भागानगरच्या सरहद्दीपर्यंतचा हा सारा मुलूख निजामशाहीनेच व्यापलेला होता.

अलीकडे दिल्लीकर मुघल बादशाह जहांगिर कुत्सित शब्दांत बोलायचा, ''निजामशहाकी यह सल्तनत बस कुछ चंद दिन का सपना है।'' गेल्या काही वर्षांत निजामशाहीला उतरती कळा लागली होती हे खरेच. अंगावर चिलखताचा साज लेऊन बारुदाच्या भरल्या तळघराशी मुकाबला करणारी चाँदबिबीसारखी निजामशाहीची तारणहार आता उरली नव्हती. तरीही निजामाच्या सल्तनतीची नौका बुड्ढा मलिक अंबरबाबा कशीबशी सावरण्याचा जिवापाड प्रयत्न करत होता.

दक्षिणेतल्या अनेक दिवसांच्या मोहिमा, लढाया-चढाया आणि झुंजींनंतर दिल्लीकरांना आणि विजापूरकरांना एका गोष्टीचा निश्चित साक्षात्कार झाला होता. आपल्या दोन्ही सत्तांचा ताकदवर दुश्मन फक्त एकच आहे, तो म्हणजे निजामशहा. दोघांनी मिळून या निजामशाहीला गोदावरीच्या पाण्यात बुडवले की दक्षिणेच्या साऱ्या कटकटी आपोआप मिटणार होत्या.

एका तिन्हीसांजेला दौलताबादच्या गडावरच्या मशाली आणि पलिते पेटायला नुकतीच कुठे सुरुवात झाली होती. त्याच वेळी एक भीतिदायक खबर घेऊन हेजीब महालात धडकला, ''हुजूर, दगा दगा!''

''क्यूँ? क्या हो गया?'' निजामाने विचारले.

''हिंदुस्थानचा पातशहा जहांगिरने ऐंशी हजाराची खडी फौज धाडलीय. दौलताबाद गिळायचा त्यांचा पक्का बेत असल्याचं कळतंय हुजूर.''

पाठोपाठ निजामशहाचा एक नातलग अंमलदार लगबगीने तिथे येऊन धडकला. हेजीबाचा सूर ओढत तो बोलला, ''त्या पातशाही लष्कराचा जोर आणि जोश इतके वरचढ आहेत, की त्यापुढे आपण पालापाचोळ्यासारखे उडून जाऊ.''

खुद्द दिल्लीपतीचे आपल्या राज्यावर महाआक्रमण चालून येणे म्हणजे नरडीवर साक्षात हत्तीने पाय ठेवण्यासारखी गोष्ट. अलीकडे निजामशाहीच्या राज्यात सुबत्ता तशी दांडगी होती. हिऱ्यामोत्यांनी भरलेले खजिने, परिपूर्ण शस्त्रागारे, बारूदखाने आणि खंडीखंडी धान्याने भरलेले अंबरखाने होते; मात्र पातशाही आक्रमण म्हणजे एक प्रकारे सागरबुडीसारखाच प्रकार ठरणार होता. दुर्दैवाने आपल्या निजामशाहीचे तारू पाण्याच्या धारेला लागले, तर खुदासुद्धा

आपणास सावरू शकणार नव्हता.

निजामाने पहाऱ्यावरच्या फौजदाराला तत्काळ बोलावून घेतले. मलिकबाबांकडे त्यांच्या हेरांनी पहाटेच ती खबर पोचवलेली होती. त्यामुळे तेव्हापासूनच जंग छेडायच्या दृष्टीने मलिक अंबरनी कशी जोरकस तयारी सुरू केली आहे, याची माहिती फौजदाराने दिली. त्याबरोबर निजामाच्या गोंधळलेल्या चेहऱ्यावर हास्य विलसू लागले. तो मोठ्या उत्साहाने महालाच्या आगाशीमध्ये जाऊन पोचला. मघापासून त्याच्या बेगमा काळजीने मखमली पडद्याच्या आडून उसासे टाकत होत्या. मध्येच बाहेर डोकावत होत्या. त्यांनाही बोलावले गेले. त्या चार रूपवान बेगमांचा घोळकाही आगाशीमध्ये जाऊन पोचला. तिथे एका चबुतऱ्यावर दुर्बीण उभारली गेली होती. तिच्या छिद्रातून निजामाचा परिवार किल्ल्याच्या खालच्या तळवटीचे निरीक्षण करू लागला.

खाली गोळीबार मैदानावर एका वेळी शेकडो मशाली आणि पलिते पेटलेले दिसले. निजामाने निरखून पाहिले, तेव्हा त्या मैदानात शेकडो शस्त्रबद्ध घोडेस्वार गोळा होताना दिसू लागले. बैलांच्या गाड्यांतून तिथे त्वरेने तोफा खेचल्या जात होत्या. तर काही बैलगाड्यांत बारुदाच्या पेट्यांचा साठा रचला जात होता. तिथले कामकाज इतके झटपट आणि चपळगतीने चाललेले दिसले, की कोणत्याही आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी निजामशाही चतुरंग सेना जशी काही सदैव मैदानावर सज्ज होऊन उभीच असावी, असे दिसत होते. निजामाला आपल्या बेगमांचे देखणे चेहरे उजळल्याचे दिसले, तसा तो अधिकच खूश होत म्हणाला, ''चलिये, अभी परेशानी की कुछ बात नहीं।''

''इतना खुद पर भरोसा मालिक?'' मोठ्या बेगमने विचारले.

''जबतक हमारे खेमेंमें मलिक अंबर और वह शहाजी मराठा हैं, तब तक डरनेका सवालही नही।''

तितक्यात मघाचा तो फौजदार नवी वर्दी घेऊन वरच्या गच्चीवर घाईने दाखल झाला. आपल्या छातीवर आदराने मूठ ठेवत, लगेच कवायती ढंगाने झुकून त्याने संदेशा दिला, ''हुजूर, शहाजीराजे का छोटा भाई शरीफजी बाहर खडा है।'' निजामाने संमतीदर्शक मान डोलावली.

आगाशीत चिरागदानांच्या तांबूस प्रकाशात एक फाकडा लढवय्या मराठा तरुण खडा होता. अंगातला घोळदार सदरा, सरदारी तुमान आणि ढाल-तलवार अशी फौजी जाम्यानिम्यातली ती तरुण मूर्ती मोठी देखणी दिसत होती.

शरीफजीच्या अंगातला सळसळता उत्साह आणि वीरश्रीचे पाणी दुरूनही सहज जोखता येत होते. निजामाने त्याच्याकडे मोठ्या अभिमानाने बघितले. शहाजींचा हा धाकटा भाऊ तिरंदाज म्हणून कमालीचा मशहूर होता. निजामाने त्याला विचारले, ''बताईये शरीफजी राजे, परेशानीकी कुछ बात है ?''

''बिलकूल नाही हुजूर! पहाटेच्या आधीच आपलं लष्कर खडकी गावचं शिवार सोडून पुढं धाव घेईल. आपल्या दोन्ही लष्कर मुखियांनी जबरदस्त व्यूहरचना केलीय.''

''ती कशी?''

''विजापुरी मुल्ला मोहम्मदाच्या आणि दिल्लीकर सेनापती लष्करखानाच्या फौजा ज्या एका मोक्याच्या मेखेवर एकत्र येतील असा अंदाज आहे, ती जागा हिशोबात घेऊनच दुश्मनांच्या त्या दोन्ही फौजांना अचूक तडाखा द्यायची योजना आपल्या शिबिरात तयार झालीय.''

निजामशहाच्या मेंदूतली चिंता हटत नव्हती. दिल्लीकरांची ऐंशी हजाराची फौज आणि विजापूरचे वीस हजाराचे लष्कर हिशोबात धरले, तरी शत्रूची संख्या लाखाच्या वर जात होती. अशा वेळी आपल्या जेमतेम चाळीस हजाराच्या सेनेनिशी शत्रूशी मुकाबला करणे हे एक वेडे धाडस ठरणार होते. त्यामुळेच निजामाने काळजीने विचारले, ''बेटा शरीफजी, तुला तरी आहे फतेहची खात्री?''

''क्यूँ नहीं सुलतान साहब?'' शरीफजी उत्साहाने म्हणाला, ''मलिकबाबांनी तर माझ्याकडूनच तुम्हाला पैगाम दिलाय, 'सांगा निजामसाहेबांना, दुश्मनाची संख्या कितीही लाखांची असू दे. इथे जंग-ए-मैदानात स्वत: मलिक अंबर आणि सोबत जवाँमर्द शहाजी भोसला मरगठ्ठा, असे दोघेही पाय रोवून खडे असतील, तर फतेहची चिंता कसली?''

निजामशहा मनापासून हसला. त्याला खात्री होतीच. मलिक अंबरचा तर जिंदगीभरचा लढाई-चढाईचा अनुभव. बुड्ढा आता अठ्याहत्तर वर्षांचा झाला होता; परंतु अंगातली जिगर आणि रणांगणावरची भरारी, दोन्ही तसूभरानेही कमी झाल्या नव्हत्या. शहाजीराजांची ती सळसळती, गोटीबंद आणि देखणी शरीरयष्टी. वय अवघे एकोणतीस वर्षांचे. त्या दोघांच्या मजबूत खांद्यांवर आपण तसे सुरक्षित असल्याची निजामशहाला खात्री होतीच; मात्र तरीही एकीकडून दिल्लीकर पातशहा आणि दुसरीकडून आदिलशाही फौजेचा तो

लाखाचा लोंढा अंगावर घेणे म्हणजे मोठीच सत्त्वपरीक्षा ठरणार होती.

निजामाने शरीफजीला न राहवून एक बारीक शंका विचारलीच, ''क्यूँ बेटे, आपलं लष्कर दुमुखी आहे. मतलब, एका वेळी दोन बडे सरदार युद्धाची व्यूहरचना करतात.''

''बिलकूल!''

''पण लष्करी पथकांची पेरणी केल्यावर शेवटचा हुकमी निर्णय कोणाचा असतो?''

''कोणाचा म्हणजे?''

''मलिकबाबाचा की शहाजीराजांचा?''

निजामशहाच्या त्या अचूक तिरंदाजीने स्वत: शरीफजीही गडबडला. न राहून तो मिश्कील हसत बोलला, ''जहाँपन्हा! तुमचा हा अचूक सवाल हे माझ्यासाठीसुद्धा एक मोठं कोडं आहे!''

''ते कसं?''

''कारण हुजूर, त्या शेवटच्या तडाख्याच्या क्षणी त्या दोघांच्या अंगात जो युद्धज्वर सळसळून उठतो, त्यावरूनही नेमकं उत्तर मिळत नाही. खरं सांगायचं तर तो शेवटचा हुकमी निर्णय म्हणजे दोघांच्या एकाच दिलाचं आणि दिमागाचं विजयी रणगीत असतं.''

हत्तीवरच्या शाही हौद्यात जाडजूड अंगाचे मलिकबाबा आणि त्यांच्या शेजारी तरुण शहाजीराजे बसले होते. लष्कर पुढचा मार्ग कापत होते. तो आसामी जातीचा प्रचंड कायेचा हत्ती आणि त्यावरचा तो चंदनी हौद सेनानायकांचा असल्याने त्याला महागडे कलाबुताचे गोंडे आणि वर मखमली पाखरही घातली होती. हौद्याच्या माथ्यावर एक पोलादी कांबीचे मजबूत छप्पर बनवले होते. रुप्याने त्यावरचा पत्रा मढवला होता. त्यावर किनखापी जाड कापडाचे आच्छादन होते. मध्येच पाऊस आला तर बाजूला गुंडाळलेले रेशमी पडदे सोडायची सोय होती.

हत्ती आपल्या मस्तवाल गतीने पुढे चालला होता. त्याच्या गळ्यातल्या सोन्याच्या घंटा किणकिणत होत्या. पाठीवर तोफा लादलेले आणखी काही हत्ती सोबत झपाट्याने वाटचाल करत होते.

मराठेशाहीच्या लष्करात शहाजी आणि शरीफजी या दोन भावांची जोडी राम-लक्ष्मणासारखी मशहूर होती. वेरूळच्या पुण्यवंत, खानदानी बाबाजी

भोसल्यांचे दोन कर्तृत्ववान पुत्र म्हणजे मालोजी आणि विठोजी. पैकी मालोजीराजांना लवकर संतानप्राप्ती झाली नव्हती. तेव्हा त्यांच्या श्रद्धाळू धर्मपत्नी सौ. दीपाबाई अहमदनगरच्या शहाशरीफ नावाच्या मुसलमान बाबांच्या दर्शनाला गेल्या होत्या. भाविक मनाच्या दीपाबाईंनी बाबांकडे 'आपला वंशवेल वाढू दे, होणाऱ्या पुत्ररत्नाला तुझे नाव देईन,' असा नवस बोलला होता. त्यानंतर मालोजी भोसल्यांची वंशवृद्धी झाली. त्यांनी पीरबाबांची याद म्हणून मोठ्या श्रद्धेने थोरल्या पुत्राचे नाव शहाजी आणि धाकट्याचे शरीफजी ठेवले होते.

ज्या अंबारीमध्ये शहाजीराजे बसायचे, त्यात शक्यतो त्यांचा भाऊ शरीफजी कधीही बसायचा नाही. झुलत्या अंबारीत बसण्याऐवजी आपल्या रांगड्या आणि वेगवान दिलपाक घोड्यावरून दौड करायला शरीफजीला खूप आवडायचे.

हत्ती-घोडी गतीने चालली होती. मलिकबाबा मध्येच शहाजीराजांकडे मोठ्या कौतुकाने बघायचे. ते मूळचे आफ्रिका खंडातील ॲबेसिनीयाच्या ओरिमा या गावातले. जातीने हबशी गुलाम. रंग जन्मजात काळा, तुकतुकीत. अलीकडे वयाच्या मानाने पोटाचा घेर खूप सुटला होता; मात्र ते तसे मध्यम उंचीचे आणि आडव्या हाडाचेच होते. त्यांचे शरीर बोजड असले तरी ते अंगमेहनतीने भलतेच काटक होते. मलिकबाबा वृत्तीने कमालीचे जिद्दी होते. आता रात्रीच्या अंधारात त्यांचा चेहरा कोळशासारखा काळाकभिन्न दिसत होता; मात्र हौद्यात एका कोपऱ्यात ठेवलेला तो सुंदरी नावाचा काचेचा दिवा; त्याच्या मंद प्रकाशात मलिकबाबांचे डोळे विलक्षण चकाकताना दिसत होते.

रात्रीचा गार वारा झोंबत होता. मध्ये बराच वेळ मलिकबाबा विचारात गुंगून गेल्यासारखे दिसले. त्यांच्या मनात आपल्या बालपणातील आठवणींची गुंडाळी फेर धरू लागली. किती घटना, किती देश आणि ते अगणित समुद्र किनारे. बोटीत चाच्यांनी नारळाच्या पोत्यात कोंबून, आफ्रिकेतून लपवून आणलेले ते काळेकुट्ट पोर, आईच्या आणि बापाच्या जागी उभी राहणारी काही बिनचेहऱ्याची वर्तुळे—, अरेबियातील ते उंची बाजार, मखमली झुली घातलेल्या सांडण्यांनी सजवलेले ते तांडे, हिरेजवाहरातांनी आणि मिठायांच्या परातींनी सजलेले बाजार, त्यानंतर पुन्हा हिंदुस्थानाकडचा कैक महिन्यांचा बोटीतला तो दीर्घ प्रवास, अहमदनगरला बाबा शरीफच्या दर्ग्यापुढचे ते लिंबाचे झाड.

शहाजींचा हात आपल्या राठ काळ्या हातात पकडत अंबरबाबा भारावल्या-सारखे बोलले, ''क्या बताऊँ बेटे! मी हा असा हबशी गुलाम, अहमदनगरला

पोचेपर्यंत चार सालांच्या भागादौडीत माझा तीन वेळा झालेला सौदा. अगदी बच्चा होतो तेव्हा मी. आम्हा गुलाम पोरांचा दर्दनाक छळ केला जायचा. बड्या खानदानी घराण्यात रात-दिन राबणारा एक इमानी कुत्ता म्हणूनच मला वागवलं जायचं. तशा हवेलीमाड्यांतून जनानखान्यात उगाच तकलीफ नको म्हणून आम्हा गुलाम पोरांची मर्दानगी ठेचून काढली जायची. बैलाचं लिंग जसं ठेचतात तशाच निर्दयीपणानं. अल्लाची मेहेरबानी म्हणून की काय मला काझी हुसेन नावाचा एक दयाळू मालिक भेटला. उसकी मेहेरबानीसेही मैं उस बलासे बच गया!''

''किती भयंकर जिंदगी बघितलीत बाबा तुम्ही!'' शहाजी उद्‌गारले.

''हो! गुलामी तर घिनौनी, जालीम! जंजीरे तोडून पुन्हा आझादी हासिल करणं केवळ मुश्कील! पुढे माझ्यावर डोंगरासारखे एहसान घडले ते त्या चंगीझखानाच्या बेगमचे —''

''कोण चंगीजखान?''

''होते इथल्या निजामशाही दरबारात एक वजीर. भला आदमी. त्यांनीच तर मला खजुराच्या पेटाऱ्यांबरोबर गुलाम म्हणून विकत घेतलं होतं. त्यांच्या मौतीनंतर त्यांच्या बेगमनंच मला गुलामगिरीच्या जाचातून कायमचं रिहा केलं.'' मलिकबाबा उत्तरले.

वाटेतल्या नद्या, डोंगर, जंगले ओलांडत फौज अविश्रांत पुढे चालली होती. पहाटे थोडा वेळ एखाद्या नदीपात्राजवळ थांबायचे अन् काही तासांची विश्रांती घ्यायचे हुकूम बिनीच्या पथकांना सुटले होते.

हत्तींच्या गळ्यातील घंटानाद वातावरणात एक वेगळीच धुंदी आणत होता. घोडी झपाट्याने पुढे निघाली होती. हजारो घोड्यांच्या टापांच्या गतीतून काही न्याराच ध्वनी निर्माण होत होता. शहाजींनी काळजीने विचारले, ''काय करायचं हो मलिकबाबा? आपल्यापेक्षा आपल्या दोन्ही दुश्मनांची फौज दुपटीहून अधिक आहे. मला थोडी चिंताच वाटते.''

''बिलकूल फिकीर करू नको शहाजी बेटे!'' मलिकबाबा मोठ्या भरवशाने सांगू लागले, ''फक्त रोशनगावच्या लढाईत एकदाच मी मोगलांकडून पराभूत झालो. नहीं तो अकबर पातशहापासून ते आता बुड्ढा व्हायला आलेल्या जहांगिरपर्यंत गेल्या तीस वर्षांत आम्ही दख्खनमध्ये मोगलांची डाळ बिलकूल शिजू दिलेली नाही. जेव्हा जेव्हा त्यांनी आमची अहमदनगरची निजामशाही

फस्त करायचा बेत रचला, तेव्हा तेव्हा आम्ही त्यांचे दात पाडून त्यांची तोंडं सुजवली आहेत.''

बोलताना मलिकबाबा मध्येच थांबले आणि पुन्हा म्हणाले, ''पण शहाजी, आज दिल्लीच्या किंवा आग्र्याच्या मंडीत सहज चौकशी करशील तर माझ्याबद्दल भयंकर हकिगती ऐकशील!''

''कोणत्या बाबा?''

''तंत्रमंत्रयंत्र सब काली जादू मेरी मुठ्ठीमें रहती हैं। सबब, प्रत्येक नव्या निजामशहाला मी माझ्या कबजात ठेवतो, अगदी पाळलेल्या कबुतरांसारखा!''

''छे! भलतंच काय?''

''काहींच्या मते तर मी काळाकुट्ट, पाताळयंत्री कापालिक आहे. जादूमंतर करतो. चोरीछुपे मी माझ्या जंगली देवांपुढे नरबळीही देतो.''

''ह्या साऱ्या मूर्खपणाच्याच समजुती आहेत.''

''आजवर मला मिळालेल्या यशाची बक्षिसी म्हणजे मेरे सभी दुश्मन मेरी जानपें उठ गये! कमसे कम चालीस बार उन्होंने मुझे धोकाधडीसे या खानेमें जहर मिलाकर जानसे दफनाने की कोशिश की है! तरीही मी दिल्लीपतींच्या समींदरासारख्या बड्या बड्या फौजांना अनेकदा पळता भुई थोडी करून सोडलं आहे.''

''वा मलिकबाबा! कमाल आहे आपल्या बहादुरीची!''

''छे छे! त्या फतेहचा मी एकटा मालिक नाही शहाजी. माझ्या दहा हजार गुलामांच्या घोडदळाबरोबर अकबर पातशहाच्या फौजेला खरं पाणी पाजलं ते तुम्हा मराठ्यांच्या बहाद्दूर घोडेस्वारांनी. ह्या दख्खनच्या दगडधोंड्यातली कष्टाळू माणसांची आणि जनावरांची फौलादी दीवार मी पातशहाच्या आक्रमणापुढे खडी केली होती.''

''बाबा, आपल्या येण्याने दख्खनमध्ये लढाईचं नवंच युद्धशास्त्र जन्माला आलं.''

''हो बेटा, कमी शस्त्रांनिशी बड्याबड्या फौजांना जेरीस आणणं हेही एक बडं शास्त्र आहे.''

''सिद्धी कशी प्राप्त केलीत बाबा आपण त्या शास्त्राची?''

''पहले असं की, मोगलांसारख्या माजलेल्या मदमस्त लष्कराची सुखाची नींद खराब करायची. त्यांची रसद तोडायची. त्यांना अगदी मेटाकुटीस आणून

उनका जीना और सोना मुश्कील कर देना!''

''हां, आता आलं लक्षात. हे दख्खनी आले कसे, लढाईला भिडले कसे हे त्यांना कळताच कामा नये, त्यांची झोपमोड व्हायच्या आधीच रणांगण लुटून न्यायचं, अशी ती मारझोडीची लढाई ना?''

''हाँ बेटे, जंग का यही असल तरीका अपनाना होगा।''

''बरोबर बाबा! आक्रमक धावपळीचा, लवचीक तरीही शक्तिमान, बेभान तरीही गतिमान असा आम्हा गनिमांचा कावा! आपल्या मातीचे डावपेच दुश्मनाला दाखवायचे ना? वा बाबा!'' स्वत:वर खूप खूश होत शहाजीराजे बोलले, ''माझ्या मस्तकात आता जळत्या पलित्यासारखा प्रकाश पडलाय. आपण धावपळीच्या आणि शत्रूची दाणादाण उडवणाऱ्या ह्या जंगाच्या रीतीला 'गनिमी कावा' असंच नाव देऊ या की!''

''बहुत खूब!'' मलिकबाबा खूश होऊन बोलले, ''शहाजी! तू तो शायर भी है। लब्जोंका जादूगर!''

गनिमी काव्याच्या अंमलबजावणीच्या दिशेने दोघांत चर्चा सुरू झाली. शहाजीराजे म्हणाले, ''मला तर खास करून असं वाटतं बाबा, एक वेळ एका पायाने तुटलेला मनुष्य काखेत कुबडी घेऊन दुसऱ्या पायावर उभा राहू शकतो; पण मनानं तुटलेला माणूस किती वेळ तग धरणार?''

''क्या मतलब?''

''मैदाने जंगमध्ये उतरण्याआधी शिबिरातच दुश्मनाचा मानसिक पराभव करायला हवा.''

''वा वा ऽऽ'' मलिकबाबा समाधानाने उद्‌गारले.

शहाजीराजे आज मनाने अतिशय प्रसन्न होते. मलिकबाबांच्या सहवासात मनाची चांगली मशागत झाली होती. जवळपास साठ वर्षांचा रणमैदानांचा अनुभव असलेल्या त्या वृद्धाकडून खूप काही ऐकायला मिळाले होते.

बोलताबोलता शहाजीच विचारांच्या वावटळीत सापडले. मग स्वत: कढत उसासे टाकत बोलले, ''मलिकबाबा, अनेकदा माझा जीव व्याकूळ होतो, एकाच प्रश्नाचा भुंगा सातत्याने सतावतो. केव्हा, केव्हा उगवतील ते आम्हा मराठ्यांचे भाग्यदायी दिवस, जेव्हा आमच्या मातीतूनच आकाराला येईल आमचं सिंहासन आणि आमच्या अस्मानात नाचतील आमच्याच मर्दुमकीचे झेंडे!''


## नवी संहिता... नवा आशय...

# प्रश्नप्रदेशापलीकडे...

**दिनकर जोषी**

अनुवाद

**अनघा प्रभुदेसाई**





बुद्धाचं जीवन आणि त्याच्या तत्त्वज्ञानाची उपयुक्तता अभ्यासपूर्णतेने अधोरेखित करणारी कादंबरी

**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पानिपतचे रणांगण

**विश्वास पाटील**




अंतर्गत कलह, दगलबाजी आणि धर्मांधतेचं जहर...
पानिपतच्या तिसऱ्या लढाईने केला संहाराचा कहर...

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

''सुभानअल्ला ऽ इस उमरमें तेरी कितनी लंबी सोचसमझ है बेटा!''

''बाबा, खरं सांगायचं तर उबग आणि वैताग येतो तो एकाच गोष्टीचा. आम्ही मराठे म्हणजे परक्या धन्यांची ओझी, नाहीतर तोफा वाहणारे बैल ऽ! कुठवर चालणार हे असं?''

शहाजीराजांच्या मनातली ती रुखरुख, अन्यायाबद्दलची चीड, ती बेचैनी मलिकबाबाला चांगली समजली. त्यांनी पट्कन शहाजीराजांचा तळहात आपल्या हाताच्या पंजामध्ये पकडला आणि ते न राहवून बोलले, ''हाँ बेटा, मैं जानता हूँ तेरी तडपती दास्तान!''

ज्यांनी अनेक देशांचे किनारे, बंदरगाह बघितलेले असतात, अनेक नद्यांचे पाणी पचवलेले असते, देशोदेशीच्या खलाश्यांचा, प्रवाशांचा, मोतियांचा आणि अंमलदारांचा ज्यांना सहवास घडतो, अशा कर्तृत्ववान भटक्यांना स्वयंसिद्ध अनेक कला अवगत असतात. कोणाला मूर्तिशास्त्रात, जनावरांच्या आजारात, वैद्यकशास्त्रात, पाकशास्त्रात तर अनेकांना ज्योतिषशास्त्रातही मोठी गती असते.

मलिकबाबांनी त्या काचेच्या सुंदरीच्या तांबूस भगभगीत प्रकाशात शहाजीराजांचा तळहात खूप बारकाईने निरखायला सुरुवात केली. तसे राजांनी विचारले, ''काय सांगताहेत आमच्या हस्तरेषा?''

''खूब तकदीरवाला है!''

''कोण? मी?''

''तू आहेसच, पण तेरा बच्चा बनेगा अपने मिट्टीका रखवाला, देशधर्म और गरीबोंका पालनहार! वह चमकेगा इन्सानोंके भीडमें भगवान जैसा और सजेगा देवताओंकी कतारमें एक राजयोगी बनकर! पूरे दावे के साथ मैं बताऊंगा यह बात।''

''खूप धन्यवाद बाबा! मात्र अशा बालकाच्या येण्याने खरंच आमचा उंबरठा सोन्याचा होणार असेल तर सांगा, त्या सानुल्याची काळजी आम्ही कशी वाहायची?''

''तुझ्या त्या होणाऱ्या बालकाला कोणाच्याही छाँवमध्ये वाढू देऊ नकोस. त्याला कोणाच्या नोकरीत वा गुलामीत ठेवू नकोस. किंवा कोणाच्या अर्धचतकोर भाकरीत गुंतवू नकोस.''

''म्हणजे काय बाबा?''

''दूसरोंकी छाँवमें ये पौधा सूखेगा। लेकिन अपनी माँकी निगाहोमें वह आसमान जैसा बढेगा। खूब खिलेगा!''

प्रवास बराच झाला होता. रात्र वाढली होती. बाबांचा हत्ती डुलतझुलत चालला होता. मलिकबाबांच्या पसरट काळ्या चेहऱ्याच्या वरच्या बाजूला चकाकणारी डोळ्यांतील ती दोन पांढरी बुबुळे दरवाजावरच्या जागृत रखवालदारांसारखी जागीच होती. एक लंबा श्वास घेत बाबा म्हणाले, ''हे बघ शहाजी, आताच तुला मी सावधगिरीचा इशारा देतो,'' एक आवंढा गिळत ते पुढे घोगऱ्या आवाजात सांगू लागले, ''एक बहुत घिनोनी खबर येऊन पोचलीय माझ्या कानापर्यंत.''

''सांगा बाबा!''

''ते दिल्लीवाले मोगल आणि आदिलशाही विजापूरकर, भेदनीतीचं एक कुटिल हत्यार चालवायच्या बेतात आहेत.''

''काय सांगता?''

''आपल्या फौजेतलाच कोणी एक सूरमा सरदार फोडून, त्याच्यामार्फत दगाफटका करायचा नीच डाव त्यांनी रचला आहे.''

''हे शंभो ऽ'' शहाजीराजे देवाच्या नावाने हुंकार टाकत अतिशय गांभीर्याने विचारू लागले, ''कोण कोण लागलं आहे त्यांच्या गळाला?''

''कोणीही असू शकतं. तू ज्याच्यावर जिवापेक्षा जास्त प्यारमोहब्बत करतोस तो तुझा शरीफजीही असू शकतो.''

''काय बोलता अंबरबाबा? अशक्य! केवळ नामुमकिन ऽ!'' तिथेच अंबारीच्या हौद्यात अर्धवट उसळी घेत शहाजीराजे कडाडले, ''हे बघा बाबा, रोज पूर्वेला उगवणारा सूर्य एक दिवस अचानक पश्चिमेलाही उगवेल; पण आमच्या शरीफकडून अशी बेईमानी कदापिही घडणार नाही. अहो, आईबापाच्या माघारी पोटच्या लेकरासारखा वाढवला आहे आम्ही त्याला. उगाच फाजील काळजी करता बाबा तुम्ही.''

''नाही रे बेटा, खूब सबक शिकवली आहे मला जिंदगीने. जे नुकसान किल्ल्याच्या सभोवती अर्धवर्तुळात ठाण मांडून बसलेला तोफांचा बेहडा हासिल करू शकत नाही, त्याहून अधिक बरबादी आपल्या घरातला कुसळासारखा आपला एखादा किरकोळ भाईबंद सहज करून जातो.''

थोड्या वेळाने शहाजीराजांना पलीकडून चालणाऱ्या आपल्या अंबारीमध्ये

जायचे होते. आळसावलेल्या अंगाला थोड्या विश्रांतीचीही आवश्यकता होती. रस्त्यात काही क्षण मलिकबाबांची अंबारी थांबली. शहाजीराजे शिडीवरून खाली उतरले आणि आपल्या अंबारीत येऊन बसले. बिछायतीची व्यवस्था लावून शागिर्द पोरांनी अंबारीतून खाली उड्या घेतल्या. ते सारे आपापल्या घोड्यावर किंवा तट्टावर बसून फौजेसोबत पुढे चालू लागले. तेवढ्यात बाहेरून 'दादासाहेब ऽ' असा आवाज आला. शहाजीराजांनी मान उंचावून उजव्या हाताला खाली बघितले, तर हत्तीच्या अंगाजवळून शरीफजीचा दिलपाक घोडा चालला होता. तो काळजीने विचारत होता, ''दादा ऽ थोडा फलाहार घ्या.''

''घेतो, फिकीर नको करू.''

''नाही हो! थकून तशीच उपाशीपोटानं रात्र काढायची तुम्हाला सवय आहे.''

''कोणी सांगितलं तुला?''

''तशी ताकीदच आहे आमच्या जिजावहिनींची त्यांच्या लाडक्या दिराला.''

शरीफजी आपले घोडे पुढे दामटवू लागला. तोच पाठीमागून सहासात घोडेस्वार वाऱ्याच्या वेगाने मध्येच घुसले. शरीफजीचा घोडा मध्ये ठेवून डाव्या आणि उजव्या अंगाने त्याच्या अंगाला अंग चिकटवीत आपली जनावरे पुढे हाकू लागले. ते सारे जवाँमर्द म्हणजे विठोजी भोसल्यांची सात मुले होती. शहाजी आणि शरीफजीची चुलत भावंडे. सारे जणच मोठ्या इरसरीने त्या युद्धमोहिमेवर बाहेर पडले होते. नागोजी भोसले अंगाने असा आडवातिडवा होता की त्याचे दोस्त त्याला 'छोटा हत्ती' म्हणूनच चिडवायचे. त्याच्या प्रवासासाठी एका वेळी दोन घोडी लागायची. त्यामुळे त्याचे शिलकीचे घोडे घेऊन सोबत एक हशम चालायचा.

निजामाच्या राजवटीत आधी मालोजी आणि त्यानंतर त्यांचा धाकटा भाऊ विठोजी या दोघांनाही मलिकबाबांची साथ आणि सावली लाभली होती. इंदापुरात मालोजी धारातीर्थी पडल्यावर विठोजींनी त्यांच्याच नावे घरचा कारभार पुढे चालवला होता. मालोजींचे दोन आणि विठोजींचे आठ असे एका घरातले ते दहा जण धट्टेकट्टे बहाद्दर म्हणजे एखाद्या लष्कराची छोटी तुकडीच असल्यासारखे सर्वांना वाटायचे. आता फक्त विठोजींचे चिरंजीव संभाजी भोसल्यांच्या जाण्याने एक जण कमी झाला होता.

एकापेक्षा एक जण उंच, धिप्पाड, दिसायला सुंदर आणि सगळेच नऊ

# मेहता पब्लिशिंग हाऊस

amazon GET IT ON Google play

यांच्या संयुक्त विद्यमाने


नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...** **eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com**

वीर मर्दानगीने मुसमुसलेले. अवघ्या निजामशाहीत वाघ-सिंहाच्या बछड्यांसारखी ती भोसल्यांच्या नऊ भावंडांची फौज गुरगुरत चालायची. स्वारीशिकारीला ते सारे मिळूनच बाहेर पडायचे. अनेकांनी त्यांच्यामध्ये फूट पाडायचा प्रयत्न करून पाहिला होता; पण अद्याप त्यामध्ये कोणाला यश आले नव्हते.

अगदी गुदस्ताची गोष्ट. दौलताबादच्या किल्ल्यावर निजामसाहेबांच्या घरी एक बडा सोहळा आयोजित केला गेला होता. तेव्हा किल्ल्यातून सजवलेल्या अंबाऱ्या गर्दीतून बाहेर पडत होत्या. तेवढ्यात सरदार खंडागळ्यांचा हत्ती खूप बिथरला. एकाएकी त्या खवळलेल्या हत्तीने आपल्या बलदंड सोंडेच्या एकेका फटकाऱ्याने वृक्षांच्या फांद्या उडवाव्यात, तसे दहा-बारा नागरिकांना एकदमच उडवून जखमी करायला सुरुवात केली. त्या हत्तीच्या बलदंड पायाखाली माणसे किडामुंगीसारखी चिरडली जाऊ लागली. त्यामुळे किल्ल्यावर 'आवरा रे आवरा ऽऽ त्या हत्तीला आवरा' असा आकांत सुरू झाला.

तेव्हा जिजाऊंचे बंधुराज आणि लखोजीरावांचा तरुण पोर दत्ताजी जाधव मागे फिरला. त्याने आपल्या हातातल्या धारदार नंग्या तलवारीने त्या हत्तीच्या सोंडेवर सपासप वार केले. त्यामुळे हत्ती अधिकच खवळला. खवळलेल्या हत्तीला काबूत आणायच्या झगड्यावरून विठोजींचे पुत्र संभाजी भोसले आणि दत्ताजी, दोघांमध्ये द्वंद्व सुरू झाले. त्याचा परिणाम म्हणून किल्ल्यावर एका बाजूला भोसल्यांची मुले आणि विरोधात जाधवरावांची सारी तरुण मुले अशी अभूतपूर्व खणाखणी आणि हाणाहाणी सुरू झाली.

त्या आपसांतल्या धुमश्चक्रीत दत्ताजी जाधवांचे मुंडके तुटले. किल्ल्यातून बाहेर पडणाऱ्या लखोजीरावांना आपल्या मुलाच्या मृत्यूची खबर कळताच ते सुडाने बेभान होऊन माघारी फिरले. माघारी फिरल्यावर त्यांनी आपल्या भाऊबंदांसाठी जोरासोराने लढणाऱ्या आपल्या जावयांकडे, शहाजीराजांकडे पाहिले; परंतु त्यांच्या प्राणाचीही पर्वा न करता जगलास काय आणि मेलास काय अशा मिशाने त्यांनी सरळ शहाजीराजांच्याच डोक्यात तलवारीचा जोरकस घाव घातला. तेव्हा केवळ पगडीमुळे ते वाचले अन् बेशुद्ध होऊन बाजूला पडले.

भयंकर संतापलेल्या लखोजीरावांनी समोरच्या गर्दीत संभाजी भोसले दिसताच अंगामध्ये जोर एकवटून त्याच्या डोक्यात तलवार घातली. टरबूज फुटावे तसे संभाजीचे मस्तक फुटले.

प्रकरण तिसऱ्याच्याच, म्हणजेच खंडागळ्यांच्या हत्तीवरून पेटले होते.

अन् भोसले आणि जाधवराव ह्या दोन खानदानांच्या जिवावर उठले होते. शेवटी मिळाले काय? त्या सायंकाळी त्या दोन्ही भावक्यांनी आपापली तरुण मुले घेऊन स्मशाने गाठली होती. तरण्या रक्तांची राख करून दोघांचेही नुकसान करून घेतले होते.

आपसातल्या अशाच दुहीच्या आणि द्वेष-मत्सराच्या आगीनेच त्या पुराण्या दौलताबाद किल्ल्याचे तोंड फोडले होते. यादवांच्या देवगिरीचे इस्लामी दौलताबादेत रूपांतर झाले होते. त्याही गोष्टीला आता तीनशे-चारशे वर्षे लोटली होती.

आज रणमैदानाकडे झेप घेताना अंबारीतून पुढे सरकणाऱ्या शहाजीराजांचे मनसुद्धा उदास होते. आता लवकरच छेडल्या जाणाऱ्या युद्धामध्ये आपल्या विरोधात आणि मोगलांच्या फौजेत आपले सासरे सरदार लखोजी जाधवराव दिसतील. कदाचित त्यांची तिन्ही मुले शस्त्रे घेऊन सरसावून येतील. मूठभेड घडेल.

त्या दुपारी निरोपाचे तबक ओवाळताना जिजाऊंनी बोलून काहीच दाखवले नव्हते; पण त्यांच्या दोन्ही डोळ्यांतल्या त्या खिन्न ज्योतींची आठवण होऊन शहाजीराजांच्या उदासीमध्ये अधिकच भर पडत होती. जिजाऊंनी मनातून नक्कीच देवाकडे धावा केला असणार, ''हे जगदीशा ऽऽ आमच्या पित्याच्या पगडीचं रक्षण करा; पण त्याच वेळी माझ्या घरधन्याच्या फेट्यावरचा तुरासुद्धा कोमेजू देऊ नकोस रे भगवंता!''

ती नऊ चुलत भावंडे त्या रात्री हसत, खिदळत, घोडी उडवत वेगाने पुढे चालली होती. शरीफजीच्या दिलपाक घोड्याच्या जीनसामानात चार-पाच टरबुजे होती. त्याने ती फळे बाहेर काढून धावताधावता आपल्या भावांच्या दिशेने फेकली. त्या बहाद्दरांनी घोड्यावरच बुक्कीने कांदा फोडावा तशी टरबुजे फोडली, आपसांत वाटून खाल्ली.

उत्तर दिशेला असलेली मोगलाई आणि दक्षिणेची आदिलशाही हे निजामाचे दोन्ही बाजूंचे दोन पडोसी. मधला निजामशाहीचा पेढा गिळायचे दोन्ही शेजाऱ्यांचे शंभर वर्षे पुराणे स्वप्न होते. त्यातही निजामशाहीचा वजीर मलिक अंबर म्हणजे निजामाचे गंडस्थळ होते हे त्यांना ठाऊक होते. चालू लढाईत त्याचा पुरा खात्मा करायचा विडा त्या दोन्ही शेजाऱ्यांनी उचलला होता.

युद्धभूमीकडे सरकताना कालपासून शहाजींना इंदापूरचा तो धगधगता

रणसंग्राम आठवत होता. तेव्हा रणांगणावर पहिल्यादांच चामडी जाकीट घालून उतरलेल्या शहाजींचे वय फक्त दहा-अकरा वर्षांचे होते. दुश्मनाच्या तोफांच्या तडाख्याने त्यांचे पिता मालोजीबाबा रणांगणात कामी आले होते. तिथेच रणभूमीवर त्यांची चिता पेटवली गेली होती. आपल्या बड्या बंधूच्या मृत्यूने धाकटे विठोजीराजे धाय मोकलून रडत होते. ते चितेजवळच कंबर मोडल्यासारखे बसले होते. त्यांच्याजवळ शरीफजीराजे पेटलेल्या चितेच्या झळा सोसत बसले होते. त्या अग्निकुंडाभोवती दीपाबाईंच्या परिक्रमा सुरू होत्या.

हातात भरलेला हिरव्या काकणांचा चुडा आणि कपाळावरचा लालभडक कुंकवाचा टिळा लेवून अहेवपणी घरधन्यासोबत सहगमन करायच्या निर्धाराने दीपाबाई चितेभोवती फेऱ्या मारत होत्या. बाजूला जमलेला गोतावळा आसवांच्या पुरात बुडून गेला होता.

ब्राह्मणांचे वेगाने मंत्रपठण सुरू होते. एकाएकी मंत्रोच्चारांचा आणि चर्मवाद्यांचा कानठळ्या बसवणारा आवाज वाढला. तशा दीपाबाई त्या अग्निकुंडाकडे झेपावू लागल्या. तोच बालशहाजी पुढे धावले. व्याकूळ झालेल्या त्या बालकाने आपल्या मातेच्या पायांना मिठी मारून दु:खाने हंबरडा फोडला, ''मातोश्री ऽ का हो करता असं? थोडे बघा ना आपल्या धाकट्या शरीफ बाळाकडे! त्याला तुमच्या पदराची ऊब हवी आहे. नका हो जाऊ ऽ ऽ.'' ते दृश्यच दगडालाही पाझर फोडण्याइतके करुण होते. दीपाबाईंचे दीर विठोजीराजे आपला शेला दीपाबाईंच्या पुढे पसरवीत कळकळीने बोलले, ''ऐका वैनीसाहेब ऽ ऽ आमच्या दादांच्या पाठोपाठ मातेसमान वहिनीही गेल्या, तर भोसल्यांचा वाड्याच्या भिंती कायमच्या उजाड आणि भकास होतील. ऐका आमचं ऽऽ''

दीपाबाईंनी नवससायासांनी झालेल्या आपल्या दोन्ही लेकांकडे बघितले. तसे आईचे आतडे कळवळले. त्यांनी वेड्या पक्षिणीसारखी झडप घेऊन शहाजी आणि शरीफजी या दोघांनाही पोटाशी ओढले.

बाळपणीचे ते दु:खी वादळी दिवस आठवले की शहाजीराजांना गहिवरून यायचे.

निजामशाही पथके रात्रीची अहमदनगरच्या दिशेने आगेकूच करत होती, त्याच वेळी दहा मैलांच्या अंतरावरून दिल्लीकर जहांगिर पातशहाच्या फौजाही जलदीने वाटचाल करत होत्या. लष्करखान, बहादूरखान, जलालखान, खंजीरखान


## नवी संहिता... नवा आशय...

# अमृतयात्रा

**दिनकर जोषी**

अनुवाद

**अनघा प्रभुदेसाई**




धृष्टद्युम्नाच्या हातून द्रोणाचार्यांचा अंत होणार होता. तरीही द्रोणाचार्यांनी उत्तम शस्त्रास्त्र विद्या दिली. काय होतं हे गूढ? द्रोणाचार्यांच्या जीवनाचे अज्ञात कोपरे उलगडणारी विलक्षण कादंबरी


**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# द्वारकेचा सूर्यास्त

**दिनकर जोषी**

अनुवाद

**अनघा प्रभुदेसाई**




यदुवंशाचा विनाश आणि भगवान श्रीकृष्णाचा अंत यांचं हृदयविदारक चित्रण असलेली कादंबरी

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

अशा मोगलांच्या सरदारांना महाबतखानाने बुऱ्हाणपूरजवळच मोठी कुमक पुरवली होती. बहाद्दूरखानाने पातशहा जहांगिरसाहेबांना वचनच देऊन टाकले होते, ''या वेळी आम्ही मलिक अंबर नावाच्या सैतानाला जिवंत पकडू. त्याला रेड्यावर पखालीसारखा करकचून बांधू आणि तसाच पेश करू आलमपन्हाँच्या दरबारात.''

रात्रीच्या काळोखाची, नद्याघाटांची वा काट्याकुट्यांची पर्वा न करता हरकारे धावत होते. शत्रूकडची बित्तंबातमी पुरवत होते. दुष्मनांच्या रपेटीच्या गतीच्या अंदाजावर मोगलांच्या आणि आदिलशाही फौजा एकत्र कोठे येऊ शकतील, याचा अंदाज शहाजीराजांकडून आणि मलिकबाबांकडून बांधला जात होता.

उजाडता उजाडता वाटेत एका बगलेवर समोरच्या नगरीतले मीनार, कमानी आणि शहराभोवतीची कुसाची भिंत दिसू लागली. नुकताच श्रावण संपून गेल्याने रानात ओला गारठा बऱ्यापैकी होताच. त्यात अहमदनगरच्या बाजूला अलीकडेच पाऊस पडून गेल्याचे दिसत होते. त्यामुळे चिखलाने वाटा बरबटून गेल्या होत्या. त्यावर चालताना हत्तींची आणि घोड्यांची चाल मंदावली. जनावरांचे पाय ओल्या मातीवर सटकू लागले.

सकाळ झाली तरी आभाळ गच्च होते. तितक्यात समोरच्या अंगाने तीन सांडणीस्वार तुरुतुरु सामोरे आले. त्यांच्याकडून खबर मिळाली, ''आज दुपारपर्यंत मोगलाई आणि आदिलशाही फौजा जवळपास येऊन धडकतील.''

वाटेत मेहकर नावाच्या छोट्या नदीचे पात्र लागले. समोर जलप्रवाह दिसताच माणसे आणि जनावरेही वेडी झाली. दिवस-रात्र सलग केलेल्या प्रवासाने सर्वांची अंगे आंबली होती. पाणी दिसताच हत्तींनी हवेत उंच सोंडा उंचावल्या. खुशीचे चित्कार काढले. ती बडीबडी जनावरे सरळ खालच्या नदीपात्रात जाऊन फतकल मारून ऐसपैस बसली. सेनानायकांनी त्यांना दोन-अडीच तास पाण्यात डुंबण्याचा आनंद घेऊ दिला.

न्याहारीचा वखत संपला. पुन्हा कूचाचे नगारे आणि पिपाण्या वाजल्या. हत्ती आणि घोडी मात्र पाण्यातून बाहेर पडायचे नाव घेत नव्हती. तेव्हा माहुतांनी आणि हशमांनी त्यांना दांडलले, थोडा लाठ्याकाठ्यांचा मार दिला. तशी जनावरे नदीचा काठ सोडून वर सरकू लागली. तिथेच पल्याड तळ ठोकायचा होता. पलीकडे एक प्रचंड मोठा नैसर्गिक तलाव दिसत होता. तलावाच्या आणि नदीच्या मधली जागा फौजी तळासाठी झकास होती. त्यामुळे अनेक

स्वारसैनिक खुशीने तिथे आपला काजाबोजा उतरवू लागले. तेवढ्यात वरून ओरडा ऐकू आला. बिनीचे अंमलदार मोठ्याने शोर करू लागले, ''भाई उधर नहीं, आगे आईये!''

मधला तो तलाव ओलांडून त्याच्या काठाने पुढे चालत जाऊन उंच माळावरच्या जागी लष्कर उतरू लागले. फौजीबाजाराच्या राहुट्या आधीच उभ्या राहिल्या होत्या. सकाळचे भोजन उघड्यावरच झाले. त्यानंतर खाशांच्या तंबूकनाती आणि डेरे उभे राहू लागले.

दुपार झाली आणि टेकडीच्या अंगाने मुंग्यांची रांग लागावी तसे दुश्मनांचे सैनिक  वेगाने खाली उतरताना दिसू लागले. मलिकबाबा आणि शहाजीराजे यांच्या अंदाजानुसार इथेच अडकित्ता पडणार होता. म्हणजे एका बाजूने मोगलांचे लष्कर आणि दुसरीकडून आदिलशाही फौज तिथे पोचणार होती.

दुश्मनांची हुशार पथके वाऱ्याच्या वेगाने दरडी उतरत त्या सोयीस्कर आणि सुरक्षित जागेचा कबजा करण्यासाठी धावू लागली. त्यांनी थोड्याच वेळात त्या बड्या तलावाच्या आणि नदीच्या मधली जागा ताब्यात घ्यायला सुरुवात केली. तशी आपली अकारण घोर फसगत झाल्याचे बघून मराठा स्वारराऊत संतापले. काही जण मसलतीच्या तात्पुरत्या उभारलेल्या राहुटीमध्ये धावले. मलिकबाबा आणि शहाजीराजे यांना ते ओरडून विचारू लागले, ''अहो राजे ऽ चला तरी, पाहा, काय घोटाळा केलात तुम्ही बघा तरी.''

''सोन्यासारखी ती जागा उगाच गमावलीत! त्या वैऱ्यांच्या अवलादींनी एकदा का तो तलाव आटवला, तर जनावरं-माणसं टाचा घासून मरतील,'' दुसरा बोलला.

''राजे, ती मेहकर नावाची छोटी नदीही कशीबशी पंधरा-वीस दिवसांची पाहुणी आहे हो, नंतर पाणी आटून तिचं वाळवंट उघडं पडेल. पाणी पाणी करत मरून जाऊ आपण!'' तिसऱ्याने भीती व्यक्त केली.

शहाजीराजांनी मलिकबाबांकडे पाहत मान उंचावली, तर मलिक दुसऱ्याच कुठल्यातरी कामात गढल्याचे दिसत होते. घाईस आलेल्या आपल्या सैनिकांकडे बघत शहाजीराजे हुकमी आवाजात बोलेले, ''जा मुकाट्याने! माघारी फिरा. गडबड नको. पाहतो.'' तेव्हा हिरमुसल्या तोंडाने ते स्वारसैनिक राहुटीबाहेर निघून गेले.

पातशाही फौजेपेक्षा निजामाचे लष्कर निम्म्याहून कमी असल्याचे गुपित

सर्वांनाच माहीत झाले होते. त्यामुळे पहिल्या दिवसापासून रणांगणावर मोगल आणि आदिलशाही फौजांचा खूप वरचढपणा आणि दबदबा होता.

रात्री दहा-अकराचा सुमार झाला. एवढ्यात खाशांच्या डेऱ्यातून दोन दूत शरीफजीला बोलवायला आले. त्यांचे बोलणे चालू असतानाच अकारण गरमागरमी झाली. अन् बघताबघता चक्क निजामशाही सैनिकांमध्ये आणि मराठा सैनिकांमध्ये जोराचे भांडण पेटले. आरोळ्या घुमू लागल्या. आवाज वाढले. आपसात शिवीगाळीचेही बार उडू लागले. ते पाहून अनेकांची धांदल उडाली. ती खबर मसलतीच्या डेऱ्यात पोचली. तसे मलिकबाबा आणि शहाजीराजे तिथे येऊन पोचले.

खुद्द मलिकबाबांनी हात जोडूनही शरीफजी आपल्या आवाजाची पट्टी खाली करेना. तसे शहाजीराजे भयंकर तडकून म्हणाले, ''असं कसंही भांडायला रणांगणावरचं शिबिर म्हणजे तुम्हाला रंगपंचमीच्या खेळातला हौद वाटतो का?'' थोरल्या बंधूंकडून असा जाहीर खरडपट्टीचा अहेर मिळाल्यामुळे अधिकच भावनाविवश होऊन शरीफजी बोलला, ''बस्स झालं दादा. तुमची लढाई तुमच्या जवळ ठेवा. ह्या नालायक निजामाच्या नादी लागून आमचा इतका अपमान करता? चाललो आम्ही आमच्या पथकानिशी बाहेर.''

''कहाँ चले बेटे?'' मलिकबाबानी मध्येच तोंड घातले.

''पुढा तिकडं मुलूख थोडा करू. तुम्हाला काय करायचंय अंबरमियाँ? तुम्हीच तर आमच्यातल्या भांडणाचं खरं मूळ आणि आगलावे आहात.''

शरीफजीचा दु:खाने, संतापाने आणि अपमानाने झाकोळून गेलेला चेहरा पाहवत नव्हता. तो कोणाचेही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. त्याने लगेच आपला दिलपाक घोडा बोलावला अन् त्यावर मांड ठोकली. बरेच तरुण शरीफजीच्या सोबत निघाले. ऐन रात्री बाहेर पडणाऱ्या त्या पथकाची संख्या पाहतापाहता तीन हजारपर्यंत पोचली. ती बाब लक्षात येताच मलिकबाबांचा आणि शहाजीराजांचा चेहरा बघण्यासारखा झाला. तळावर असे दुहीचे नागडे दर्शन घडायला नको होते. जे घडले ते चांगले नव्हते. भांडणावेळी आजूबाजूला जी बाजारगर्दी झाली होती, त्यामध्ये दुश्मनांचे हेर असणारच, त्या चिंतेने शहाजीराजे आणि मलिकबाबाही अधिक चिंतातुर झाले होते.

खुशीची ती खबर शत्रुतळावर पोचली होती. त्याच खुशीत मोगलाई पथके बिर्याणी-कुर्मा खाऊन खुशाल झोपी गेली.

## नवी संहिता... नवा आशय...

# एके दिवशी





**डॉ. गिरीश वालावलकर**

उद्योगसमूह, राजकारण, गुन्हेगारी आणि आर्थिक अफरातफर यांचा परस्पर संबंध अलगद उलगडत श्रीधर, चारुलता, यशवंत या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी स्वभावाचे पैलू स्पष्ट करणारी कादंबरी

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# अराजक




**विल्यम डॅलरिंपल**

अनुवाद

**रेश्मा कुलकर्णी-पाठारे**

हजारो मैल दूर असलेल्या कंपनीनं चार खोल्यांच्या कार्यालयातनं दोन लाख सैनिकांच्या बळावर भारतावर वर्चस्व गाजवलं. या वसाहतवादी गळचेपीत भारताची लूट केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या या जुलमी कारकिर्दीचा सडेतोड विल्यम डॅलरिंपल यांनी घेतलेला धांडोळा.

**किंमत : ७९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

रात्री पावसाची एक सर येऊन गेली. अन् पहाटे मोगलांच्या पथकावर आभाळ कोसळल्यासारखे झाले. आभाळात उठलेले ढग आपल्या डेऱ्यादांड्यावर येऊन एकाएकी कसे कोसळताहेत तेच त्यांना समजेना. त्यातच हत्तीच्या अंगासारखे पाण्याचे लोट त्यांच्या तळावर घुसले. राहुट्याराहुट्यांतून पाणी, नाकातोंडातून पाणी! त्या प्रकारामागचे कारणच कळेना. चौफेर ''या अल्लाऽ'' ''बचाओ खुदाऽऽ'' अशा किंकाळ्या फुटल्या. माणसे आणि जनावरे पाण्याच्या धारेला लागली. मोठ्या मुश्किलीने एकदुसऱ्याला कसाबसा हात देऊ लागली.

बऱ्याच उशिराने खरी गोम त्यांच्या लक्षात आली. मराठा वीरांनी काळोखातच मागच्या अंगाने जाऊन पहारी आणि खोरी लावून त्या तलावाला भगदाडे पाडली होती. तो पाण्याचा प्रचंड बांध रात्रीचा फोडून दिला होता! त्या पथकाचा म्होरक्या शरीफजी भोसलेच होता. पिसाटल्यासारखा तो पाण्यातून इकडे-तिकडे सैरावैरा धावत होता. त्याने भांडणाचे सोंग करत दुश्मनाला गाफील ठेवून त्यांच्यावरच डाव उलटवला होता.

भर रात्रीचाच धडपडून जागा झालेला मुल्ला मोहम्मद पुरा हादरून गेला होता. तिथेच आपल्या गोटासमोर चिखलात गुडघ्यांवर बसून तो अल्लातालाची करुणा भाकू लागला. थंडीने कुडकुडलेल्या लष्करखानने त्याला विचारले, ''मुल्लासाहब, ये कैसी मुसीबत?''

''अरे हुजूर, ह्या प्रलयात पाच-दहा हजार सैनिक डुबून मेले असते तरी पर्वा नव्हती; पण शिलकीत ठेवलेलं अन्नधान्य, बारुदाच्या पेट्या, गारभांडी आणि घोड्यांचा सारा चंदीचारा या पाण्यात पुरा रफादफा झाला.''

''अल्ला! ये क्या मुसीबत है?''

''देखिये ना — जंगाला सुरुवात व्हायच्या आधीच आमचे इरादे आणि मुरादे सारे वाहून गेल्यासारखे दिसतात!'' निराशेने मुल्ला मोहम्मद उद्गारला.

दिवस उजाडला. दुश्मनांची पथके थंडीवाऱ्यात स्थिरस्थावर व्हायला वेळही मिळाला नाही. तेवढ्यात टेकडीच्या माथ्यावरून निजामी तोफांना बत्त्या दिल्या गेल्या. भातवडीच्या त्या रानात धुडूमधाम तोफा गर्जू लागल्या. मोगली आणि आदिलशाही सैनिकांची एकच तारांबळ उडाली. स्वार आहेत पण घोडी उधळलेली. साहिन आणि जंबरूका यांसारख्या उंटावरून भडिमार करणाऱ्या तोफा सज्ज आहेत; पण त्या जलप्रलयाच्या गदारोळात उंट वाट दिसेल तिकडे

धावताहेत. घोडी उधळलीत. तोफांच्या तोंडी ठासायला बारुदाच्या पेट्या जवळ नाहीत! तरीही मुल्ला मोहम्मद हिमतीचा सेनानी होता. त्याने न डगमगता आपल्या जिवाची पर्वा न करता आपले सारे सरदार दरकदार एकत्र बांधले. त्या गोंधळाच्या स्थितीत त्या दुहेरी फौजेने पलीकडे तीन मैलांवर माघार घेतली. आपली उधळलेली फौज आणि उरलेला घासदाणा सांभाळायचा कसोशीने प्रयत्न चालवला.

मुल्ला मोहम्मदाचा मोगली तोफांवर अजून भरवसा होता. शिवाय काबूल-कंदाहारपासून अनेक लढायांची आग पचवलेल्या तीनशे पहाडी, बळकट हत्तींचे दल मोगलांच्या दिमतीला होते. त्यामुळे उडालेली त्रेधातिरपीट कशी सावरायची आणि कमीत कमी वेळेत झडप घालून आपल्या लष्कराचे मनोबल कसे वाढवायचे याच विवंचनेत तो अडकला होता.

भातवडीचे रक्तमांसाला चटावलेले मैदान काही महिने असेच धगधगत राहिले होते. विजापूरच्या आदिलशहाला आणि दिल्लीपती जहांगिर बादशहाला या जंगातून बऱ्याच गोष्टी हासिल करायच्या होत्या. दोघांनाही एकदाचे निजामशाहीचे कंबरडे मोडायचे होते आणि त्याच वेळी निजामाला हे वैभवाचे दिवस आणून देणाऱ्या मलिक अंबरचा पुरता काटा काढायचा होता. कुठला कोण आफ्रिकेत जन्मलेला एक काळाकुट्ट गुलाम पोर इकडे येतो काय, कर्तृत्वाने वजीर बनतो काय आणि निजामशाहीवर तोरण चढवतो काय, त्याला एकदा संपवायचेच!

दुश्मनांच्या दोन्ही दलांत ठरल्याप्रमाणे या मोहिमेचा पूर्ण खर्च आदिलशहाने आपल्या खजिन्यातून करायचा होता. त्यामुळेच उत्तरेतून आलेल्या मोगली सरदारांना घाई नव्हती. मात्र मुख्य ऐंशी हजाराची फौज मोगलांची होती. त्यामुळे अल्प फौज असलेला आदिलशाही मुल्ला मोहम्मद धाडसी निर्णय घेऊ शकत नव्हता. त्याच वेळी लढाईची शेपूट अकारण लांबत चालल्यामुळे इकडच्या दलातील शरीफजीसारखे तरुण कमालीचे नाराज होत होते. एके दिवशी शरीफजीने शहाजीराजांकडे हट्टच धरला, ''काय होईल ते होईल! एकदा लढाईचा निकाल लागू द्याच!''

''बेटा शरीफ, थोडी कळ काढ.''

''आम्ही विचारतो, थांबायचं तरी कशासाठी?'' शरीफजीने उतावीळपणे विचारले.

“मलिकबाबाच्या खतरनाक भेज्यावर भरवसा ठेवण्यासाठीच.”

“आजकाल तर ते खूप थंडे आणि सुस्त दिसताहेत.”

“याचाच अर्थ त्यांच्या डोक्यात कोणतंतरी अजब रसायन शिजतंय.”

“किती भरवसा ठेवाल त्या बुड्ढ्यावर दादा?” शरीफजी धुसफुसत बोलला.

“अरे पण वेड्या! आपल्यापेक्षा दुप्पट फौज जवळ असूनसुद्धा समोरचे ते बडेबडे पातशाही आणि आदिलशाही सरदार लढाईला तोंड फोडायची अजून हिंमत दाखवत नाहीत. याच्या पाठीमागचा खोल मतलब समजून घेशील की नाही?”

“थोडा रुकिये, आता तुम्हाला जास्त इंतजार करावाच लागणार नाही!” अचानक कानावर मलिकबाबांचे शब्द पडले, तसे शिबिरात थोडे ऐसपैस बसलेले सर्व खासे झट्‌कन सावरून बसले. त्यांना बाहेरून गोटात आलेले मलिकबाबा अभिमानाने सांगू लागले, “सह्याद्रीच्या गिरीकंदरात जन्माला येणारी तुम्हा मराठ्यांची जात! हरणांपेक्षा वेगाने दौड करणारी आणि गरुडांच्या पिलांसारखी कड्याकपारीतून खाली झेप घेणारी! तुम्ही कमालीचे धाडसी, कडवे, लढवय्ये —तुमच्या अंगीच्या या गुणांचा योग्य वेळी वापर करून घेण्यासाठी मी बेताब झालोय!”

मलिकबाबांच्या बोलण्यातून त्यांच्या उरामध्ये विलक्षण असे काहीतरी खदखदते आहे याचा वास शरीफजी, मंबाजी, सरफोजी, अशा सर्व भोसले बंधूंना लागला.

शरीफजीला जागेवर स्वस्थ राहणे ठाऊकच नव्हते. अनेकदा तो आपले छोटेखानी पथक सोबत घ्यायचा. रात्रीबेरात्री दुश्मनांच्या गोटांच्या आजूबाजूने चकरा मारत राहायचा. विशेषत:, दिल्लीहून आलेल्या मोगलांच्या हत्तीदलाबद्दल त्याने बरेच काही ऐकले होते. एकदा तो आपल्या सहकाऱ्यांनिशी एका उंच टेकडीवर जाऊन पोचला. तिकडे पलीकडच्या दरीसारख्या खोलगट भागात त्याला आडोशाला हुंदडणाऱ्या तीनशे महाकाय हत्तींचा कळप दिसला. ती गजांतलक्ष्मी टेकडीच्या पायथ्याशी संध्याकाळच्या सोनेरी उन्हात निवांत झुलताना दिसत होती. माहूत त्यांना वटवृक्षाची कोवळी पाने खाऊ घालत होते.

मोगलांच्या हत्तीदलाचा प्रमुख मनचेहर नावाचा सरदार होता. दिसायला सडपातळ आणि अगदी शेवग्याच्या शेंगेसारखा उंच. आग्रा शहरात लहान

बच्चा असतानाच तो पातशहाच्या पीलखान्यात कामाला लागला होता. त्यामुळेच हत्तींचे संगोपन, त्यांचे रोग, त्यांचा जंगे मैदानात वापर करून घेणे, युद्धासाठी भांगेसारखी गुंगीची औषधे पाजून हत्तींना तयार करणे, या साऱ्या लहानसहान गोष्टींकडे त्याचे लक्ष असायचे. त्याने आपल्या हत्तीदलात आसामी, ब्रह्मी आणि दक्षिणेतील मलबार प्रांतातूनही अव्वल जातीचे हत्ती पैदा केले होते.

"हमें और कुछ नहीं चाहिये। बस उस बुढ्ढे मलिक अंबरकी मुंडी चाहिये! नहीं तो आग्रे की तरफ लौटना मत!'' असा सज्जड दम पातशहा जहांगिरने लष्करखानाला भरला होता; मात्र ज्या पद्धतीने काही महिने भातवडीच्या रानात मोगली आणि विजापुरी फौजांना मलिक अंबरने झुलवत ठेवले होते, वैरणीच्या गंज्या आणि घासदाण्याची कोठारे एकदा पाण्याने भिजवून आणि पुन्हा एकदा जाळून रसदीचा साठा नामशेष केला होता, त्यामुळे लष्करखानच्या आणि मुल्ला मोहम्मदच्या तोंडचे पाणी पळाले होते.

जंग-ए-मैदानसाठी होणारी देर आता दुश्मनांचे अंग जाळू लागली होती. एके सकाळी अंबरने आणि शहाजीने झडप मारायची पुरी तयारी केली आहे, अशी बातमी कानावर आली. तशी विरोधी पथके गडबडली. टेकडीच्या बाजूने युद्धाचे नगारे आणि तंबूरताशे वाजू लागले. एकदाचे घमासान लढाईला तोंड फुटले. मलिक अंबरचे डोळे बहिरी ससाण्यासारखे समोरच्या पथकांचे अचूक निरीक्षण करू लागले. शहाजीराजांनी अंगात पोलादी बख्तर घातले होते आणि डोईवर जिरेटोप घातला होता. त्यांनी मोठ्या निर्धाराने शत्रूच्या फळीत आपला घोडा घुसवला होता. वाऱ्याच्या झोताने फडकणाऱ्या निशाणकाठीवरील तांबड्या झेंड्यासमोर त्यांची चर्या भलतीच तेज:पुंज दिसत होती.

दिलपाक घोड्यावर आरूढ झालेला शरीफजी तर नुसता खळीला आला होता. त्याच्या कमठ्यातून निघणारे तीर सटसट बाहेर सुटत होते. त्याच्या तेज तिरंदाजीने समोर गोंधळ उडवला होता. पलीकडच्या सैनिकांच्या कोणाच्या खांद्यात, कोणाच्या मांडीत अगर पाठीत एकदा शरीफजीच्या धनुष्यातून सुटलेला बाण रुतला, तर समोरच्या सैनिकाला आपल्या शरीराचा तो भाग लुळा पडल्यासारखे वाटत होते. अंगात भयंकर कळावेदना सुटून ते जागीच गडाबडा लोळत होते.

"हर हर महादेवऽऽ'' आणि "अल्ला हो अकबरऽऽ'' च्या गगनभेदी आरोळ्यांनी रान भरून जात होते. मध्येच तोफांच्या तोंडातून बाहेर पडणारे ते

आगगोळे उडून समोरच्या सैनिकांना आणि जनावरांना भाजून काढत होते. त्यांच्या जळत्या, जिवंत चमडीला सुटलेला करपता वास नाकातले बाल जाळत होता.

सकाळी बारा वाजता पेटलेले युद्ध पुढे भडकतच राहिले. अस्मानात धुराची दाटी झाली. सूर्य झाकोळल्यासारखा दिसू लागला. घोड्यांच्या आणि हत्तींच्या पायाखाली गारद झालेल्या माणसांच्या मुंड्यांचा आणि धडांचा तुडवून चिखल होऊ लागला. तलवारीला तलवारी आणि भाल्याशी भाले असे त्वेषाने भिडत होते की, त्या दोन्ही बाजूंच्या मर्दांच्या पगड्या आणि मुंडाशी रक्ताने चिंब भिजून निघत होती. शहाजी आणि खेळोजी भोसले बंधूंनी चालवलेली ती तिखट तलवारबाजी बघून भीतीने दुश्मनांची छाती फुटत होती. शहाजींच्या तलवारीच्या पात्याचा आडवा तडाखा जोरात सुरू होता. ज्याने दुश्मनाकडची मुंडकी केळीच्या घडासारखी कचाकच तुटून खाली पायात कोसळत होती. त्यांच्या अंगातील बख्तर आता रक्ताने माखून गेले होते.

युद्धभूमीवर निखारे फुलतच होते. त्याचे चटके माणसा-जनावरांना बसत होते. दुपार व्हायला आली. निजामशाहीची आणि मराठ्यांची पथके जेरीस येण्याचे नाव नाही, उलट ती शिरजोर ठरताहेत, हे पाहून लष्करखानाने नवा डाव टाकला. त्याने शिलकीतले मनचेहरचे तीनशे हत्तींचे दल रणांगणात पुढे काढले. समोरून कडाडधूम, धुडूमधाम असा तोफगोळ्यांचा नंगा नाच सुरू होता. त्या धुराधगीची पर्वा न करता अफू-भांगेच्या सेवनाने बहोश झालेले हत्ती पुढेपुढे घुसण्याचा प्रयत्न करत होते.

एका अंबारीत लष्करखानाबरोबर मुल्ला मोहम्मद बसला होता. ते दोघेही 'मारो ऽ तोडो ऽऽ' असे तोंडाला खरस येईपर्यंत ओरडत होते. आपल्या शिपायांना चेतवण्याचा प्रयत्न करत होते. मुल्ला मोहम्मद तर अंबारीच्या हौद्यात उभा राहून नाचत होता. तेवढ्यात पलीकडून एक जळता तोफगोळा आला आणि त्याच्या तडाख्याने मुल्ला मोहम्मदची मुंडी चेंडूसारखी उडाली. रक्ताने चिंब ओले झालेले धूड तिथेच हौद्यात कोसळले. पलीकडच्या गर्दीत उडून गेलेली मुंडी शोधायला खोजांना खूप वेळ लागला.

आदिलशाही म्होरक्या मुल्ला मोहम्मद ठार झाल्याचे लष्करखानाला दुःख होतेच; पण तोफगोळ्यांच्या माऱ्याने डोंगरासारखे हत्ती ज्या वेगाने एकापाठोपाठ एक कोसळू लागले, आगीने भाजलेले ते रक्तमांसाचे जिवंत ढीग जमिनीवर

## नवी संहिता... नवा आशय...


# प्रकाशाची सावली

**दिनकर जोषी**

अनुवाद

**स्मिता भागवत**

गांधींच्या आदर्शांमुळे प्रवाहपतित झालेल्या
हरिलालच्या जीवनाची शोकांतिका





**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# प्रतिनायक

**दिनकर जोषी**

अनुवाद

**स्मिता भागवत**




बॅ. मोहम्मद अली जीना यांच्या निधर्मी ते कट्टरतावादी अशा प्रवासाचं,
त्यांच्या वैचित्र्यपूर्ण जीवनाचं आणि व्यक्तीमत्त्वाचं व्यामिश्र दर्शन
घडविणारी कादंबरी

**किंमत : ७२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

गडबडा लोळू लागले, चीत्कार करू लागले, तेव्हा त्या मौल्यवान जनावरांची ती हानी बघून मात्र लष्करखानाचे पाय भीतीने थरथरले. त्याने हरकारे धाडून मनचेहरला बोलावून घेतले. त्याला कळकळीने सांगितले, ''बेटा मनचेहर ऽ तेरे हाथीही हमारी पातशाही फौजकी असली ताकद है। त्यांना जंग-ए-मैदानातून हळूच हुशारीने पण फौरन बाजूला काढ. त्यांना मागे वळवून अशा जागेत लपवून ठेव की, सही मोक्यावर तो आगीचा दरिया पुन्हा लढाईमध्ये घुसून ह्या नादान मरगठ्ठ्यांची आणि निजामाच्या फौजेची हड्डीपसली एक करून टाकेल. दुश्मनाला जाळून खाक करेल!''

हुकुमाप्रमाणे सायंकाळीच मनचेहरने तामिलीला सुरुवात केली. आपल्या हत्तींना तो सुरक्षित स्थळी घेऊन चालला. पुन्हा मोगलांच्या घोडदळाच्या राखीव तुकड्या आत घुसवल्या गेल्या; मात्र मलिकच्या आणि शहाजींच्या धाडसी आक्रमणापुढे पातशाही-आदिलशाही लष्कर टिकेना. तरीही युद्ध जिंकणे आवश्यक होते. लष्करखानाच्या तोंडातून एकाच वेळी रक्त आणि लाळ, दोन्ही गळू लागले होते.

आजच्या लढाईत नऊही भोसले बंधूंनी शौर्याची परिसीमा गाठली होती. शत्रूचे कंबरडे मोडल्यासारखे झाले होते. आता मोगलांच्या बाजूचे दृश्य खूपच करुण आणि बीभत्स दिसू लागले. अनेक गतप्राण हत्तींची धुडे, त्याखाली चेंदामेंदा झालेले मानवी मृतदेह, मध्येच माणसा-जनावरांच्या मांसाचे ढीग, रक्ताचे पाट आणि पलीकडे कोसळलेली उंटांची धुडे. जागोजाग ताज्या रक्तमांसाचा असा भयंकर सडा पडला होता. सुरुवातीला गिधाडे रणाच्या पोटात मोठा कलकलाट करत घुसली होती. त्यांच्या उपाशी, चिवट, लंब्या चोचींनी ताज्या माणसा-जनावरांच्या मांसावर यथेच्छ डल्ला मारला होता. भरपेट मांस खाऊन ते कातिल पक्षी धुंद झाले. आपले रक्ताळलेले पंख फडफडवीत बाजूच्या बांधावर झुंडीने जाऊन बसले.

दिवस पलीकडे सरकू लागला. निजामी आणि मराठी लष्कर विजयी रथाच्या दिशेने आगेकूच करू लागले. मोगल आणि आदिलशाही फौजांची पळापळ सुरू झाली.

त्याच वेळी अंधारातून तीनशे हत्ती मोठमोठ्याने चित्कारत उत्तरेच्या दिशेने पळू लागले होते. त्यांच्या पावलांच्या दणक्याने धरणीकंप झाल्यासारखा आवाज होत होता. वाटेतले छोटेखानी वृक्ष आणि तरू त्या रपाट्याने गवतांच्या

काड्यांसारखे मोडून पडत होते. हत्तींच्या गळ्यातल्या घंटांचा मोठाच नाद घुमत होता.

धुराधगीच्या त्या गर्दीत आणि धावपळीच्या घिसाडघाईमध्येही पाठीमागे तात्पुरत्या उभारलेल्या त्या तंबूत तातडीची मसलत सुरू झाली. त्यासाठी सारे खासे एकत्रित आले होते. ज्या पद्धतीने मलिकबाबांच्या आणि शहाजीराजांच्या फौजेने दुश्मनाला आज अगदी जेरीस आणले होते, त्यांचा रेच मोडून काढला होता, त्यामुळे स्वत: शहाजीराजे अत्यंत प्रसन्नचित्त दिसत होते. ते खुशीच्या धुंदीत उद्‍गारले, ''चला मलिकबाबा! आज आपण दुश्मनाला अगदी सडकून काढला. त्याची उडालेली ती दाणादाण बघून आपण विजयाच्या अगदी उंबरठ्यावर जाऊन पोचलोच आहोत असं समजा.''

मलिक अंबरच्या चेहऱ्यावरचा ताण नाहीसा झाला नव्हता. ते काळजीच्या भोवऱ्यात अडकल्यासारखे दिसले. म्हणूनच त्यांच्या मुखातून आपसूक शब्द बाहेर पडले, ''पराभवाचं दु:ख मिळालं नाहीये; पण फतेहचं-विजयाचं सुख तरी कुठं लाभलंय हो शहाजीराजे?''

''असं नरमाईचं का बोलता बाबा?'' शहाजींना मलिकबाबांचा रागच आला.

''देखिये शहाजीराजे! जबतक जहांगिर पातशहाचं ते तीनशे हत्तीचं दळ शाबूत आहे, तबतक अपनी कुछ खैर नही।''

''पण त्यांनी तर रणांगणातनं त्यांच्या हत्तींचं दळ केव्हाच माघारी वळवलंय की–''

''पीछे हटनेवाला सही मौका देखके फिर जंग-ए- मैदानमें कूद नहीं पड सकता क्या?''

''छे! ते इनमिन तीनशे हत्ती असं काय वाकडं करू शकणार आहेत आमचं?'' शहाजींनी त्वेषाने विचारले.

''पातशहाकी वह हाथीवाली झुंड जंग की तकदीर बदल सकती है! एका हत्तीचा ढालीसारखा उपयोग करून त्याच्या आडोशानं किमान पचास शिपाई बेडरपणे पुन्हा जंग-ए-मैदानात घुसू शकतात. असे तीनशे हत्ती– गिनती करून तर बघा– तीनशे हत्तींच्या त्या आडोशाने जहांगिर पातशहाची पंधरा हजाराची फौज फिरसे लौटकर हमें दबोच दे सकती है। जोवर ही हाथीवाली झुंड टिकून आहे, तोवर भातवडीचं हे जंग-ए-मैदान आपल्या कबजात येणं नामुमकिन

आहे.''

''असं काय?'' समरांगणातले खरे आव्हान ध्यानात येताच शहाजीराजांची छाती त्वेषाने तटतटून गेली. त्यांच्या धमन्यांतले रक्त पेटून उठले. आपली वज्रमूठ वळवून तिचा टोला आपल्या छाताडावर मारत शहाजीराजे कडाडले, ''चला मलिकबाबा ऽऽ बाहेर अंधार पसरला असला, तरी माझ्या काळजातले सुडाचे निखारे निमालेले नाहीत. हा अंधार फाटून दिवस उजाडायच्या आत त्या मोगलांच्या हत्तीदळाला गाठून नष्ट केल्याशिवाय हा शहाजी रणातनं माघारी वळणार नाही!''

राजांच्या मुखातला तो कौल मलिकबाबांना मनापासून आवडला. ते घाईने बोलले, ''चलिए, काहीही करून दुश्मनाचा तो बडा हत्तीखाना आत्ताच चिरडण्यासाठी एखादा खंदा वीरच पाठवावा लागेल. बोलिये, उस खाईकी तरफ अभी कौन दौडेगा?''

''मी सांगतोय काय मलिकबाबा– मोगलांचा तो पीलखाना नावाचा पोलादासारखा पहाड वितळवून नामशेष करणं हे कोणा पोरासोराचं काम नव्हे. आम्ही स्वत:च आता तिकडे धाव घेणार!'' साऱ्या खाशांवरून आपली नजर फिरवत शहाजीराजे बोलले.

''थांब दादा ऽ ह्या धर्मकृत्यासाठी बाकी कुणी नाही,'' रणमदाचा चेव चढलेला शरीफजी पुढे सरसावत मध्येच कडाडला, ''ह्या कामगिरीवर मीच जाणार!''

''तू–? शरीफ तू?'' शहाजीराजे अचंब्याने विचारू लागले.

''का हो दादासाहेब? कशासाठी रोखायला निघालात तुम्ही मला? ही भावाबद्दल तुम्हाला वाटणारी माया अगर भीती समजायची की कसला संशय येतोय तुम्हाला माझ्याबद्दल? वयानं लहान असणाऱ्यालाही महान कर्तबगारी बजावायची संधी द्या की दादासाहेब.''

शहाजीराजांनी शरीफजीच्या फाकड्या आकृतीकडे आपादमस्तक बघितले. वीरश्रीने इतके ओथंबून गेलेल्या आपल्या धाकट्या, लाडक्या भावास त्यांनी याआधी कधीच बघितले नव्हते. रणाचा मुका घेण्यासाठी उतावीळ झालेली त्याची काया बघून राजे दिपून गेले. अशा स्थितीत त्याला रोखणे हासुद्धा गुन्हा ठरणार होता. त्यामुळेच उत्साहाच्या तोऱ्यात शहाजीराजे बोलून गेले, ''बेटा शरीफ, तू तर वाघाचा बछडा आहेस– तू जा. खुशाल रणाचा मुका घे; पण

बाळा, वेळा सांगून येत नाहीत.''

''असं का बोलता दादासाहेब?''

''हे बघ, तुझ्यासोबत तू ह्या हंबीरराव चव्हाणाला आणि आपल्या खेळोजीलाही ठेव.'' शहाजीराजांनी शरीफजीला आशीर्वाद दिला.

तिथून बाहेर पडताना शरीफजीने झट्कन पाठीमागे मान वळवून आपल्या भावाकडे बघितले, तेव्हा शहाजीराजे गलबलले. पोटात रपकन भाला घुसलेल्या हरणासारखे शरीफचे डोळे झाकोळून गेल्यासारखे राजांना भासले.

मोगलांचे ते हत्तीदल आपल्या कबजात घेण्यासाठी ते मराठा सरदार वेगाने आपली घोडी उधळवीत होते. ऐन युद्धाच्या धामधुमीत पातशहाची अशी गजांतलक्ष्मी हिसकावून आणणे हा बहादुरीचा कळस ठरणार होता. त्या विजयश्रीवर युद्धाचा निर्णायक निकाल लागणार होता. त्यामुळेच त्या दोघांच्या अंगातले रक्त रसरसत होते. त्याची जाणीव शरीफच्या दिलपाक अश्वालाही झाली होती. त्यामुळे ते बहाद्दूर जनावरही प्राणाची पर्वा न करता ओढ्याओघळींतून पुढे झेपा घेत होते.

मराठ्यांच्या पथकाने चालवलेला तो अतिशय चिवट पाठलाग बघून मनचेहरही अचंबित झाला होता; मात्र बलदंड हत्तींच्या नेमक्या हालचाली आणि उलटासुलटा पेरा करून युद्ध जिंकायची कला त्याला माहीत होती. त्यामुळेच वाटेत धावताधावता एखाद्या ओढ्याचा आडोसा लागला की तो त्याचा फायदा उठवायचा. हत्तींना दाटीवाटीने उभे करून त्यांची भिंत उभी करायचा. त्यांच्या आडोशाने बाणांचा आणि भाल्यांचा चिवट प्रतिहल्ला चढवायचा. वाटेत त्याने दोन वेळा अशा भिंती उभ्या केल्या होत्या; मात्र रणमदाने खळीस आलेले दोन्हीकडचे बहाद्दर माघार घ्यायचे नाव घेईनात.

मराठ्यांकडून शरीफजी, हंबीर चव्हाण आणि खेळोजी, या तिघांनी चालविलेल्या खुनशी पाठलागाने मनचेहर पेटला. तिसऱ्यांदा त्याने वाटेत आणखी एकदा हत्तींची भिंत उभी केली होती. आडोशाचा फायदा न घेता तो मोठ्या बहाद्दुरीने सरळ आपल्या एका हत्तीच्या पाठीवर चढला. तिथूनच हौद्याच्या आधाराने तो आणि त्याचे साथीदार पाठीशी लागलेल्या मराठ्यांना भिडले. बाणांचा पाऊस पाडू लागले. भाले फेकू लागले.

आपला दुश्मन असा निधड्या छातीने समोर उभा ठाकल्याचे शरीफजीने बघितले, तशी त्याच्याही रक्तमांसात आग धुमसली. मग जिवाची अजिबात

तमा न करता शरीफजीने आपला दिलपाक घोडा तसाच रेट्याने पुढे हाकला. घोडा हत्तीच्या एका बगलेवर जाऊन आदळला आणि शरीफजीने हातातली नंगी तलवार उगारत बेडरपणे मनचेहरच्या हत्तीवरच्या हौद्यात उडी ठोकली!

रणमदाने धुंद झालेले ते दोघे वीर एकमेकांच्या अंगावर तलवारींचा सड्याने मारा करू लागले. त्यातूनही पुढे उसळी घेत शरीफजीने थेट मनचेहरची मुंडी आपल्या हाती पकडली. तो ती एखाद्या मल्लासारखी मुरगळण्याचा प्रयत्न करू लागला. तेवढ्यात आजूबाजूच्या अंधारातून सूं सूं करत शरीफजीच्या अंगावर बाणांचा वर्षाव झाला. त्या तिरंदाजीमुळे अंगात बाणांची जालीम टोके घुसून शरीफजीच्या रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. तरीसुद्धा त्याचे हात ढिले पडत नव्हते.


तोवर पलीकडच्याच हत्तीवरून एक तीक्ष्ण टोकदार भाल्याचे रुंद पाते झणकन पुढे आले अन् शरीफजीच्या बरगड्यांत घुसले, तसा गरम रक्ताचा लोंढा हौद्यात खाली सांडू लागला. शरीफजीचे हात ढिले पडले आणि त्याचा बेहोश झालेला तो रसरसता देह अंबारीतच खाली कोसळला. त्या बहाद्दराची मुंडी छाटून नेण्यासाठी साताठ गनीम पुढे झेपावले; मात्र सुदैवाने हंबीर चव्हाणांनी आपला घोडा मध्येच रेमटवला, अन् शरीफजींच्या रक्ताने न्हालेल्या शरीराला झट्‌कन मिठी मारून त्यांना ओढून, खेचून घेऊन तो मागे फिरला.

खरे तर शहाजीबाबांचा एकुलता एक भाऊ म्हणून शरीफजींच्या जखमांवर उपचार करून त्यांचे प्राण वाचविणे हेच हंबीरचे धर्मकृत्य ठरणार होते. त्यासाठी जखमी शरीफबाबांना पाठीमागे पळविण्याची त्यानी तयारी चालवली; मात्र शरीफजी त्याही अवस्थेत रण सोडून मागे फिरायला बिलकूल तयार नव्हता. बरगडीचा पिंजरा तोडणाऱ्या त्या भयंकर जखमेने शरीफजीला हैराण केले होते. त्याचा रक्ताने माखलेला देह हंबीररावाने आपल्या एका खांद्याच्या बगलेवर पेलला होता. त्या फुटल्या बरगडीतून असा रक्तस्राव चालला होता की, हंबीरची पाठ, पोट त्या गरम चिकट रक्ताने पार बरबटून गेले होते; पण त्याही बहोश स्थितीत शरीफजी कळवळून बोलला, ''हंबीरदादा, बरगडीतल्या या जालीम जखमेनं माझी हाडंपेरं बांधून घातली आहेत रे! काय करू? तिकडं शहाजीदादा माझ्या वाटेकडे डोळे लावून बसले असतील!''

''शरीफबाबा! त्यासाठी तर सांगतोय. चला पट्‌कन माघारा! शिबिराकडे पळू या, जखमा बांधू या.''

## नवी संहिता... नवा आशय...

# परतुनि ये घनश्याम...




**दिनकर जोषी**


अनुवाद

**स्मिता भागवत**

श्रीकृष्णाच्या अवतारसमाप्तीनंतरची
स्मृतिरूप आणि चिंतनीय गाथा

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# कृष्णं वन्दे जगद्गुरुम्




**दिनकर जोषी**

अनुवाद

**सुषमा शाळिग्राम**

शब्दांतून साकारता येणाऱ्या आणि शब्दांपलिकडल्या श्रीकीष्णाचं
बहुआयामी दर्शन

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

''शिबिरात पोचून जखमा बांधण्यात वखत घालवायचा? अरे असं कसं होणार हंबीरदादा? ज्या दिशेला शरीफजी जाईल तिकडून येताना विजयाचं सोनं लुटून आणेल याची खात्री असते रे माझ्या दादांना—त्यासाठीच वाट बघत असतील ते.''

''ठीक आहे. शरीफबाबा, तुम्ही थोडा विसावा घ्या. आम्ही पुन्हा एकदा कंबर कसून त्या मोगलांच्या हत्तीदळावर तुटून पडतो!''

अगदी नाईलाजाने हंबीरराव बाजूच्या अंधाराकडे वळला. तिथे त्याने पिंपरणीच्या झाडाखाली शरीफजीला गवतावर अलगद झोपवले. त्याच्या अंगातून अजून रक्ताचे ओघळ खाली गवत-मातीत वाहत होते. त्याचा जीव व्याकुळला होता. तरी हंबीरला निरोप देताना शरीफजीने त्याला जवळ हटकले. आपला रक्ताने बरबटलेला चिकट तळहात हंबीरच्या पंजात ठेवत, कण्हत शरीफजी बोलला, ''हंबीरदादा, एक वचन दे!''

''कसलं?''

''हे बघ, जर आपल्या पथकाला जीत मिळाली, तरच माझं कलेवर पालखीत घालून माझ्या दादाकडे घेऊन जा. दुर्दैवानं हार झाली, तर मात्र माझा मुडदा तसाच उघड्यावर पडू दे ह्या रणांगणात. मला विसरून जा—नाहीतरी रणभूमीत असे शेकड्यांनी मुडदे इर्दगिर्द पडलेलेच असतात. त्यातलाच असेन मीसुद्धा एक.''

शरीफजीच्या मुखातले ते जगावेगळे शब्द ऐकून हंबीरराव चव्हाणाचे काळीज फाटून गेले. तो कळकळीने बोलला, ''शरीफबाबा, असं का बोलता आपण?''

''कारण—काय सांगू, जन्मभर माझ्या दादांपुढे मानासन्मानानं उभं राहायची ह्या देहाला आदत पडून गेलीय रे! म्हणूनच सांगतो, काय वाट्टेल ते झालं तरी माझ्या पराभूत मुडद्याचं दर्शन माझ्या डोंगरासारख्या भावाला घडायला नको.''

डोळ्यांतली गरम आसवे पुसत हंबीरने त्याही स्थितीत शरीफजीला मानाचा मुजरा केला. हातात हात पकडून त्याला धीर दिला. पुन्हा आपल्या सैनिकांची जमवाजमव करून हंबीर चव्हाण मोठ्या धाडसाने समोरच्या बादशाही हत्तीदळावर तुटून पडला.

त्या अंधारातच लढाईची जोरदार खैंदळ माजली. मराठा स्वारांच्या घोड्यांनी आडव्यातिडव्या उड्या घेत त्या हिंदुस्थानी हत्तींना जागीच फिरवून, मारा करून

अगदी बेजार केले. त्याच वेळी पिंपरणीखालून ''चला हाणा ऽऽ मारा दुश्मनाला ऽऽ, बोला हर हर महादेव!'' अशा शरीफजीच्या जोरकस आरोळ्या कानावर पडत होत्या. आपल्या बरगडीतला रक्ताचा उमाळा थांबवण्यासाठी तो भुईवर पालथा पडून हाताच्या पंजाने रक्ताची धार रोखण्याचा वेडा प्रयत्न करत होता; मात्र त्याच्या रणगर्जनेने, लढणाऱ्या तुकडीच्या अंगात दहा हत्तींचे बळ संचारले होते.

अखेर मध्यरात्रीच्या सुमारास पातशाही हत्तीदळ पूर्ण मोडून पडले. घामाने उफाळून गेलेला हंबीरराव पिंपरणीखाली आला. आता अंधारातून कसलाच आवाज येत नव्हता, त्यामुळे तो सटपटला. दिवटीच्या लाल-पिवळ्या उजेडात त्याने शरीफजीकडे नजर टाकली, तेव्हा त्याला शरीफजीच्या चर्येवर वाळल्या रक्ताचे ओघळ दिसले. विजयश्रीचा जेव्हा वारा लागला, तेव्हाच काही वेळापूर्वी मोठ्या समाधानाने शरीफजीने प्राणत्याग केला होता. कोमेजल्या कमळाच्या फुलासारखी शरीफजीची मुद्रा दिसत होती.

दुसऱ्या दिवशी त्या हिरव्या रणकुरणात सूर्याची कोवळी किरणे उतरत होती. भोयांनी पालखी शहाजीराजांसमोर आणली. राजांनी वरचा तांबूस शेला बाजूला सरकवला. अत्यंत थंड्या, दु:खी नजरेने त्यांनी समोर पाहिले, तेव्हा त्यांच्या देहातल्या अत्यंत कठोर आणि धैर्यवान भिंतींना तडा देऊन त्यांच्या कंठातून एक जोरदार हाक बाहेर पडली- ''बेटा शरीफजी ऽऽ'' शब्द जिभेवरच अडखळले, सारी पृथ्वीच सभोवती गरगर फिरत असल्याचा भास झाला. शरीफजीसोबतचे बालपणीचे ते सूरपारंब्याचे खेळ, ते वेरूळ, घृष्णेश्वराच्या मंदिराचे आवार, बाबाजी भोसल्यांचा परंपरागत देव-देवतांनी आणि मूर्ती-टाकांनी गच्च भरून गेलेला तो देव्हारा! शहाजीराजांना ते सारे सारे आठवत होते. ते एकटक शरीफजीच्या अत्यंत देखण्या चेहऱ्याकडे पुन:पुन्हा बघत होते—ते मिटलेले नेत्र, ती कोवळी दाढी, दाढीच्या केसात आटलेले ते काळपट रक्त. त्यांचा सारा देह 'शरीफबाबा ऽऽ' असा आकांत करत होता.

शेवटच्या क्षणी हत्तीवर पुढच्या पायाचे खूर ठेवून आपल्या धन्यासाठी उभा ठाकलेला तो दिलपाक अश्व. शरीफजीने मनचेहरच्या अंबारीत उडी घेतली आणि दुसऱ्याच क्षणी जंबुरक्याच्या तोफेचा एक गोळा आला अन् दिलपाकच्या मानेवर तो आगीचा गोळा पडला. त्याची मान त्या आगीच्या तडाख्याने तुटली, रक्तमांसाचे जळके लचके आजूबाजूच्या धूळमातीत पडले.

शरीफजींच्या सहकाऱ्यांनी त्या घोड्याचे धूडही सांग्या लावून उचलून समोर आणून ठेवले होते. त्या बहाद्दूर धन्याचे आणि त्याच्या वफादार जनावराचे अंत्यसंस्कार रात्री एकाच वेळी उरकण्यात आले.

अनेक बड्याबड्या विजापुरी आणि मोगलाई सरदारांच्या हातापायांत बेड्या ठोकल्या गेल्या होत्या. त्यांना पागेसारख्या दिसणाऱ्या एका कोंडवाड्यात जखडून ठेवले होते. रात्रभर संरक्षणासाठी कडा पहारा ठेवला होता. मलिक अंबरचा आणि शहाजींचा खात्मा करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या ह्या बड्या सरदारांची दुर्दैवी अवस्था बघवत नव्हती. मलिकबाबांच्या चेहऱ्यावर हसू फुटले होते. सकाळी लांब दोरखंडाच्या गाठीमध्ये पाय बांधलेली खाशा युद्धकैद्यांची माळ पुढे ओढली जात होती. तेवढ्यात पाठीमागून निजामी आणि मराठा शिपायांनी कल्ला उठवला, ''अरे वो देखो ऽऽ बघा रे तो मनचेहर, मनचेहर!''

हातापायांत साखळदंड बांधलेल्या मनचेहरला शहाजीराजांच्या आणि मलिकबाबांच्या समोर आणून उभे केले गेले. आपल्या धाकट्या भावाचा हत्यारा बघून शहाजीराजांचा चेहराही मोठा कठोर बनला. पाठीमागून स्वार-सैनिकांच्या आरोळ्या आणि गदारोळ वाढला, ''मार दो ऽऽ मनचेहरकी मुंडी उडा दो!'' तोवर खेळोजी भोसले त्वरेने पुढे झाला. त्याने धारदार खुरासनी तलवारीचे पाते शहाजीच्या हाती दिले आणि तो गरजला, ''चल, उडव शहाजी या हरामखोराला!''

शहाजीराजांनी मनचेहरकडे एक नजर टाकली. रक्त-घामाच्या ओघळांनी माखलेला त्याचा तो भीतिदायक चेहरा आणि मरणाच्या भीतीने थरथरणारे त्याचे अवघे शरीर बघवत नव्हते. मनुष्याच्या डोळ्यांसमोर जेव्हा मृत्यूचा काटेरी जबडा उभा राहतो, तेव्हा भल्याभल्या महावीरांचे हातपायसुद्धा बर्फासारखे गोठून जातात. मनचेहरला आपल्या डोळ्यांसमोर मौत दिसली, तसा तो खाली कोसळला. गुडघ्यावर बसून, छाती पिटत करुण सुरांत तो शहाजीराजांकडे दयायाचना भाकू लागला, ''रहम राजा! रहम करो ऽऽ दया करो!''

''मारा ऽऽ उडवा मुंडी त्या कुत्र्याची!'' पाठीमागून सैनिकांच्या आरोळ्या दुमदुमल्या.

स्थिर देहाने उभ्या ठाकलेल्या शहाजीराजांकडे पाहून खेळोजीने त्यांना

ललकारले, "चल ऽऽ उडव शहाजी त्याचं मुंडकं एकदाचं!"

शहाजीराजे कसनुसे हसले. आपल्या हाती धरलेले खुरासनी तलवारीचे पाते म्यान करत ते बोलले, "राहू दे खेळोजी. शरण आलेल्या जिवाला मरण दिलं तर मराठ्यांच्या दारावर पुण्याईचं तोरण कसं टिकणार? जाऊ दे—" हिंदुस्थानात याआधी असे कधीच घडले नव्हते. मोगलांच्या चतुरंग सेनेला असा सपाटून मार कधीच बसला नव्हता. भातवडीमध्ये तर त्यांच्या कुमकीला आदिलशाही फौजाही गेल्या होत्या. तरीसुद्धा त्यांना लज्जास्पद, दारुण पराभवाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे हिंदुस्थानचा पातशहा जहांगिर कमालीचा प्रक्षुब्ध बनला होता.

जहांगिर पातशहा आता हळूहळू वार्धक्याकडे झुकला होता अन् नेमकी त्याच वेळी शहजादा शहाजहानने बापाविरुद्ध उघड बगावत केली होती. त्यामुळे पातशहाला उत्तरेत गंगा-यमुनेच्या काठाकडेच रुतून राहावे लागत होते. एवढ्या बड्या पातशाहीला खडे चारण्यात निजामाच्या फौजा पहिल्यांदाच यशस्वी झाल्या होत्या. त्या अपूर्व विजयप्राप्तीप्रीत्यर्थ दौलताबादेत ईदच्या किंवा दिवाळीच्या सणासारखा उत्साही माहोल बनला होता.

आपल्या विजयी फौजांचा आणि सेनाधिकाऱ्यांचा गौरव करण्यासाठी दौलताबाद नगरी आतुर झाली होती. खुशीने वेड्या झालेल्या बुऱ्हन निजामशहाने लगेचच फतेहचा दरबार भरवला होता.

आपल्या घरधन्याने एवढा प्रचंड विजय हासिल करावा याचा जिजाऊसाहेबांना खूप अभिमान वाटत होता. त्यामुळेच अन्य मराठा सरदारांच्या कुटुंबीयांसमवेत त्यासुद्धा मुद्दाम दरबारात हजर होत्या. निजामाचा तो नयनरम्य शीशमहाल आज कमालीचा ताजातवाना आणि सुंदर दिसत होता. निजामसाहेबांची प्रतीक्षा करत बडे बडे सरदार समोरच्या रांगेला बसून होते. दुसऱ्या ओळीत खेळोजीचे सगळे बंधू, मालोजी, नागोजी, कक्काजी आदी सर्व जण- ऐटदार रेशमी किंवा मखमली वस्त्रांमध्ये तिथे मौजूद होते.

बाहेरच्या चंदनी महिरपी कमानीजवळ तंबुरताशे आणि शिंगेकर्णे फुंकली गेली. सेवकांचा, अंमलदारांचा आणि पहारेकऱ्यांचा लोंढा वेगाने पुढे धावत आला. त्यांच्यापाठोपाठ बुऱ्हन निजामशहा साहेब आणि त्यांच्या मागोमाग दोन पावले अंतर टाकत जाडजूड अंगाचे वजीर मलिक अंबर दिमाखात आत प्रवेश करताना दिसले. दरबारात उत्साहाला उधाण आले. इतरांशी बोलत उभे

असलेले तिसऱ्या रांगेजवळचे शहाजीराजे पुढे झाले. समोरच्या रिकाम्या आसनावर बसावयास गेले. तेवढ्यात निजामाच्या ताफ्यात त्यांच्या सोबत असलेले खेळोजी भोसले पुढे झाले. त्या रिकाम्या आसनावर नेमके त्यांनी ठाण मांडले. तशी शहाजीराजांनी चमकून आपली मान गर्रकन निजामशहांकडे केली, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की निजामशहांचे शहाजींकडे लक्षच नव्हते. उलट ते आदराने खेळोजींकडे हात करत 'तिथे समोरच बसा' अशा खाणाखुणा करत होते.

दरबाराला सुरुवात होणार होती. शहाजीराजे नाईलाजाने मागच्या रांगांकडे वळले. तिसऱ्या रांगेत त्यांना एक आसन रिक्त दिसले, त्या जागेवर जाऊन ते स्थानापन्न झाले.

दरबाराचे कामकाज सुरू झाले, तशी आधीच अपमानित झालेल्या शहाजीराजांच्या रुंद गोऱ्या पाठीवरून घामाचे ओघळ उतरले. मलिकबाबा बोलायला उभे राहिले, तेव्हा त्यांनी सुरुवातीला इस्लामी पथकांच्या बहाद्दुरीची तारीफ केली. त्यानंतर मराठा स्वारशिपायांनी 'खेळोजी भोसल्यांच्या नेतृत्वाखाली' गाजवलेल्या शौर्याची खूप वाहवा केली. पुढे शरीफजीच्या बलिदानाचे एका ओळीत का होईना कौतुक केले. अन् भाषण संपवताना शहाजीराजांचा कसाबसा ओझरता उल्लेख केला.

दरबाराचा आजचा सूर आणि नूर काही वेगळाच होता. आज जाणूनबुजून आपल्या उपमर्दाचे षड्यंत्र रचले गेल्याची जाणीव शहाजीराजांना झाली. हे काय चालले आहे?

त्या मानी मराठ्याच्या स्वाभिमानाला डंख लागल्यामुळे ते मध्येच ताड्कन उठले आणि धाड धाड पावले टाकत दरबारातून तडक बाहेर पडू लागले, तेव्हा त्यांच्या मनधरणीसाठी कोणीही पाठोपाठ धावलेही नाही. कोणत्याही दरबारामध्ये सत्तेचे हस्तक, खुशमस्करे हे असेच असतात, वाहत्या वाऱ्याकडे आणि उगवत्या ताऱ्याकडे तोंड उभे करून!

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच अपमानित राजांची पथके आपल्या परांड्याच्या महालाकडे कूच करू लागली होती. अंबारीच्या हौद्यात राजांसमवेत बसलेल्या जिजाऊंचा चेहरा खिन्न आणि मलूल दिसत होता. काल जिथे आपल्या भ्रतारावर त्याच्या भीमपराक्रमाची दाद म्हणून सुवर्णफुले उधळून टाकायला हवी होती, तिथे अपमानाच्या शेणकाल्याची राळ उडवली गेल्याचे

आठवून त्यांचे हृदय दु:खाने आतल्या आत रडत होते.

''अशी प्राणांची बाजी लावून दिल्लीपतीविरुद्ध झुंजलो. त्याच्या फौजेचा खात्मा केला. पातशहाचे तीनशे हत्ती लुटून आणले. पाठचा शरीफजीसारखा भाऊही गमावला; पण एवढं करून काय कमावलं हो राणीसाहेब आपण? दरबारातली ती अपमानास्पद प्रेतयात्रा?''

''राजे, धीरानं घ्या.''

''जाऊ दे—पण एकीकडे आपला जाणूनबुजून पाणउतारा करायचा आणि त्याच वेळी आपल्या चुलत भावंडांना सन्मानाचं बळ देऊन आमचा घोर अपमान घडवून आणायचा हा सारा मुद्दाम घडवून आणलेला कपटकारस्थानाचा भागच होता जिऊ!''

''जाऊ द्या! सोडून द्या! राजे, गाढवांच्या ओसरीवर गीतापठण करण्यात व्यर्थ वेळ तो का घालवायचा?'' जिजाऊसाहेब बोलल्या.

शहाजीराजे रुसले नव्हते तर कमालीचे वैतागले होते. निजामशाहीतल्या पाषाणहृदयी वृत्तीची त्यांना शिसारीच आली होती. स्वत:हून स्वत:लाच नजरकैदेत कोंडल्यासारखे ते परांड्याच्या किल्ल्यावर आपल्या महालात पडून होते.

एके सकाळी मंबाजी भोसले त्यांच्या भेटीला आले. त्यांचा चेहरा काळवंडलेला आणि अपराधी दिसत होता. शहाजींची दयायाचना करत मंबाजी बोलले, ''दादा ऽ यापुढे मला तुमच्या सोबतच राहायचं आहे. जिकडे जाल तिकडे. मग तो राजदरबार असो वा स्मशान!''

''एवढा खेळोजीसारखा पुण्यप्रतापी बंधू लाभला असताना तुम्हाला आमची काय गरज?''

''आम्हालाही ठाऊक आहे की, अनेकांचा जळफळाट!'' मध्येच तोंड घालत जिजाऊ बोलल्या, ''भोसल्यांच्या घरचे हे दहा पांडव एकत्र नांदतील तर नवं महाभारत जिंकतील! त्या भीतीपोटीच त्या दुष्टांनी आरंभलेला हा कावेबाजीचा खेळ!''

''अगदी मनातलं बोललात आपण वहिनीसाहेब,'' मंबाजी बोलले.

दुपारी मंबाजीनी शहाजीराजांसमवेत भोजन घेतले, तेव्हा कुठे आपल्या ठणकत्या, कोंडलेल्या मनाचा थोडाफार निचरा झाल्यासारखे शहाजीराजांना वाटू लागले.

दिल्लीकरांच्या आणि विजापूरकरांच्या लाखाच्या फौजेला फक्त पंचवीस-तीस हजारांच्या अल्प फौजेने पाणी पाजले होते. त्यासाठी मलिक-शहाजींनी मुद्दाम निवडलेले रणक्षेत्र, रात्रीबेरात्री अचानक घातलेले छापे, शत्रूच्या पुन:पुन्हा कापलेल्या रसदेच्या रेषा आणि स्थानिक परिस्थितीचा युद्धासाठी करून घेतलेला नेटका उपयोग, त्या सर्वांमुळेच या नव्या 'गनिमी काव्या'चा आणि मलिकबाबा आणि शहाजीराजे या जोडीचा सर्वदूर गौरव चालला होता.

परंतु, दुर्दैवाचा सर्वांत मोठा भाग म्हणजे त्या नव्या विजयी मर्दाला घोर अपमानाच्या गर्तेमध्ये लोळत पडावे लागले होते. निजामशाहीच्या सर्वश्रेष्ठ पदावर असलेल्या मलिकबाबाने आपल्यासाठी काहीही न करावे या दु:खाने शहाजीराजे पोळून निघत होते.

दोन दिवसांनंतर मात्र अवचितपणे मलिकबाबांकडून एक खलिता शहाजीराजांच्या हाती येऊन पडला. त्या लांब खलित्यावरून शहाजीराजांचे डोळे झरझर फिरले

*''बालके शहाजी वालिद मालोजीराजे भोसले—*


*गेल्या हफ्त्यात पार पडलेल्या शाही सोहळ्यात खरे तर तुमच्या पुण्यपराक्रमाबद्दल तुमच्या गळ्यात तेज:पुंज रत्नांचे अलंकारच पडायला हवे होते; मात्र आपल्या वाट्यास भर दरबारात जी उपेक्षा आणि हेटाळणी आली, त्याचे खूप दु:ख आमच्या दिलात आहे. वडीलकीच्या नात्याने तुम्हास थोडा धीर धरण्याचा सल्लाच आम्ही देऊ. काय करायचे? ह्या दुनियेचे आणि दैवगतीचेही खेळ खूप अजीब असतात.*

*एके काळी अकबरासारख्या कीर्तिवंत पातशहाने माझ्याकडे जासूस धाडले होते. तू दखखनच्या एका छोट्याशा दौलतीसाठी झुंजण्याऐवजी बेटा आमच्याकडे ये! हिंदुस्थानच्या वजीराचा जिरेटोप घेऊन मी दिल्लीच्या वेशीमध्ये तुझा इंतजार करत खडा आहे, असे त्यांनी मला मधाचे बोट लावले होते! मात्र तेव्हा इथे चाँदबिबीसारखी एक महामाता अहमदनगर किल्ल्याच्या संरक्षणासाठी अंगात चिलखत घालून बारूदाच्या खंदकाबाहेर आगीच्या जिभेवर खडी होती! महान युगस्त्री!*

*विजापुरात दिलेली अहमदनगरची ती लाडकी लेक वैधव्य आल्यानंतर शत्रूच्या जबड्यात जाणारे माहेर वाचवण्यासाठी धावलेली आजच्या काळची जणू रझिया सुलतानाच! अशा रणदेवतेशी आणि इथल्या मातीशी मी स्वार्थासाठी*

## नवी संहिता... नवा आशय...

# उत्तुंग




## मृणालिनी सावंत

भारतीय मिथक कथांतील सर्वांत अद्‌भुत आविष्कार असलेल्या श्रीकृष्णाचा, लोकनायकाच्या भूमिकेतून सादर केलेला मानवतावादी प्रवास

**किंमत : ७९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# गोवा
### ... मला दिसलेला




## सुधीर देशपांडे

गोव्याची अभिजात ओळख आणि निसर्ग सौंदर्याचं हलक्याफुलक्या भाषेत केलेलं वर्णन

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

*गद्दारी केली असती तर? गुलामांच्या अंगात असलेल्या इमानाशी प्रतारणा केली म्हणून 'काळ' माझ्यावर खदखदा हसला असता! पण ह्या अशा इमानांची आणि खस्तांची बक्षिसे तरी कोणती आली आमच्या वाट्याला? किमान तीस-चाळीस वेळा मला जिवानिशी मारायचे भयंकर कट खेळले गेले.*

*तुझ्यासारखाच तकलीफचा दर्द मी सोसतो आहे; कारण आता निजामशाहीतही सचोटीचे पहिले दिवस उरलेले नाहीत. तुझ्याबद्दल खोल विचार करताना मला असे वाटते की तुझ्यासारख्या बहादुर पुरुषाचे तेज दिवसेंदिवस वाढत जावो. तुझ्या बडौतीसाठी तुझ्या भगवानाने आणि आमच्या अल्लाने तुझीच पाठराखण करावी.*

*अधिक काय लिहू?*
*तुझाच चाचाजान*
*मलिक अंबर*

मलिकबाबांच्या त्या खलित्याने शहाजीराजांचा आणि जिजाऊसाहेबांचा दिवस खूप समाधानात गेला.

दुसऱ्या दिवशी दुपारी सदरेवर निरोप आला की सोलापूरचे प्रसिद्ध जवाहिरे बिस्मिल्लासाहेब सकाळपासून राजांच्या भेटीसाठी तिष्ठत आहेत आणि त्यांच्या सोबत शहानवाज नावाचा विजापुरी सौदागरही आला आहे.

त्या दोघांना आत बोलावले गेले. शहाजीराजांकडे कौतुकाने पाहत बिस्मिल्लासाहेब बोलले, "राजन, जसा एखाद्या रत्नपारख्याला एखाद्या लालजर्द माणकाचा छंद लागला तर तो त्याच्याभोवती पतंगासारख्या घिरट्या मारत राहतो, तसे तुमच्यासाठी कोणीतरी खूप झुरते आणि मरते आहे!"

"वा ऽ बहोत खूब मियाँ! इथे युद्धभूमीत आम्ही एवढे रक्ताचे पाट वाहिले तरी त्याचं कोणाला काही पडलेलं नाही, तिथे आमच्यासाठी कोण कशाला झुरेल? मरेल?" शहाजीराजांनी विचारले.

"राजन, काही खानदानी जवाहिरे असे असतात, जे जिंदगीतल्या चढ-उतारांच्या आणि नर्मी-गर्मीच्या पलीकडे खऱ्या हिऱ्यावर आपली पारखी नजर ठेवून असतात."

"असा कोण आहे तो रत्नपारखी की, ज्याच्यासाठी आपण ही इतकी विशेषणांची खैरात लावली आहे?"

"देशोदेशीच्या कलावंतांसाठी आणि बड्या कलमबहाद्दरांसाठी ज्याने नवरसपूर

नावाची नगरी निर्माण केली, जो तुमच्यासारखाच मर्द आणि शक्तिवान तलवार-बहाद्दर आहे.''

''कोण? इब्राहीम आदिलशहासाहेब?''

''बिलकुल सही!''

''छे छे! अहो महाशय, आपण रास्ता चुकलात की काय? आम्हीच ते शहाजीराजे आहोत, भातवडीच्या युद्धात विजापूरच्या शेकडो शिपायांचा खात्मा करणारे. अजून आमच्या हातावरचे रक्ताचे डागही पुसले गेले नसतील. तर आमच्यासारख्या दुष्ट शत्रूचं स्वागत करायला तुमच्या इब्राहीम शहाला वेडबिड लागलंय की काय?''

''नाही राजन, पण तुमच्या प्राप्तीसाठी मात्र ते नक्कीच पागल झाले आहेत!''

''अहो, पण भातवडीचं नुकसान?''

''गये गुजरे पल मोजण्याऐवजी त्यांना आनेवाले कलकी अधिक चिंता आहे. उद्या अन्य कोणाचा धावा येऊन विजापूरचं कंबरडं मोडेल! त्याआधीच तुमच्यासारख्या मजबूत कमरपट्ट्याची 'सरलष्कर' म्हणून आमच्या बिजापुरी सल्तनतला अधिक जरूरत आहे.''

त्या अनाहूत, अकल्पित निमंत्रणाने शहाजीराजे अचंबित झाले. त्यांचे डोळे चमकले. त्यांनी गर्रकन आपल्या दालनाकडे नजर टाकली, तेव्हा मघापासून तिथे कान देऊन उभ्या असलेल्या जिजाऊसाहेब दिसल्या. अन् त्यांच्याकडे पाहताना राजांना अचंबा वाटला. जिजाऊंच्या डोळ्यांत पसंतीची मोहोर लख्ख उठून दिसत होती!

◆

## १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२१ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

**१७ ऑगस्ट - सचिन पिळगांवकर यांचा जन्मदिन**

'हाच माझा मार्ग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३५९/-**

**१८ ऑगस्ट - गुलज़ार यांचा जन्मदिन**

'त्रिवेणी', 'रावीपार', 'गुलज़ार पटकथा', 'धागे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७२०/- । सवलत किंमत १०६९/-**

**१९ ऑगस्ट - सुधा मूर्ती यांचा जन्मदिन**

'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'अस्तित्व', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'डॉलर बहू', 'गरुडजन्माची कथा', 'गोष्टी माणसांच्या', 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य', 'कल्पवृक्षाची कन्या', 'महाश्वेता', 'परीघ', 'पितृऋण', 'सुकेशिनी आणि इतर कथा', 'थैलीभर गोष्टी', 'वाइज अँड अदरवाइज', 'स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...', 'पुण्यभूमी भारत', 'सामान्यांतले असामान्य', 'सर्पाचा सूड', 'आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी', 'तीन हजार टाके', 'त्रिशंकू', 'दोन शिंगे असलेला ऋषी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४१३५/- । सवलत किंमत ३१०१/-**

**१९ ऑगस्ट - फ्रॅन्क मॅक्कोर्ट यांचा जन्मदिन**

'अँजेलाज अॅशेस' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत २८९/-**

**२० ऑगस्ट - नारायण मूर्ती यांचा जन्मदिन**

'नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य', 'अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४३५/- । सवलत किंमत २८९/-**

**२० ऑगस्ट - एस. एल. भैरप्पा यांचा जन्मदिन**

‘पर्व’, ‘वंशवृक्ष’, ‘काठ’, ‘आवरण’, ‘मंद्र’, ‘पारखा’, ‘तडा’, ‘तंतू’, ‘परिशोध’, ‘सार्थ’, ‘उत्तरकांड’, ‘साक्षी’, ‘गृहभंग’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५०७५/- । सवलत किंमत ३५५३/-**

---

**२१ ऑगस्ट - ब्रॅड थॉर यांचा जन्मदिन**

‘ब्लॅक लिस्ट’, ‘फुल ब्लॅक’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ६०९/-**

---

**२३ ऑगस्ट - नेल्सन डेमिल यांचा जन्मदिन**

‘द लायन्स गेम ’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२४ ऑगस्ट - अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ यांचा जन्मदिन**

‘मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स’, ‘टिअर्स ऑफ द जिराफ’, ‘द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी’, ‘द फुल कबर्ड ऑफ लाइफ’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६०९/-**

---

**२५ ऑगस्ट - तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन**

‘लज्जा’, ‘फेरा’, ‘निर्बाचित कलाम’, ‘नष्ट मेयेर नष्ट गद्य’, ‘निर्बाचित कबिता’, ‘आमार मेयेबेला’, ‘उधाण वारा’, ‘फरासि प्रेमिक’, ‘द्विखंडित’, ‘शोकोलग्रिह हारालोजार’, ‘भाबनागुलो’, ‘बेशरम’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३३३०/- । सवलत किंमत १९९८/-**

---

**२५ ऑगस्ट - फ्रेडरिक फोरसाइथ यांचा जन्मदिन**

‘नो कम बॅक्स’, ‘द अफगाण’, ‘द फिस्ट ऑफ गॉड’, ‘मध्यस्थ’, ‘द ओडेसा फाइल’, ‘द किल लिस्ट’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२२५/- । सवलत किंमत १३३९/-**

---

**२५ ऑगस्ट - पुरुषोत्तम अग्रवाल यांचा जन्मदिन**

‘नाकोहस’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**२६ ऑगस्ट - नॅन्सी यी फान यांचा जन्मदिन**
‘तलवारीचा शोध’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९०/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२९ ऑगस्ट - धिरेंद्र मेहता यांचा जन्मदिन**
‘छावणी’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२९ ऑगस्ट - इनग्रिड बर्गमन यांचा जन्मदिन**
‘माय स्टोरी’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

---

**३१ ऑगस्ट - शिवाजी सावंत यांचा जन्मदिन**
‘मृत्युंजय’ (नाटक), ‘छावा’ (नाटक), ‘मोरावळा’, ‘कांचनकण’, ‘शेलका साज’, ‘अशी मने असे नमुने’, ‘कवडसे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११०५/- । सवलत किंमत ६८९/-**

**खालील संचांवर १ ते १५ सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१ सप्टेंबर - कुंदन तांबे यांचा जन्मदिन**
‘नाना आणि महादजी’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२ सप्टेंबर - नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन**
‘चाकाची खुर्ची’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**२ सप्टेंबर - शुभदा गोगटे यांचा जन्मदिन**
‘अस्मानी’, ‘चला जाणून घेऊ या! फेंग शुई’, ‘चला जाणून घेऊ या! सुख’, ‘चला जाणून घेऊ या! रेकी’, ‘चला जाणून घेऊ या! तणाव व राग’, ‘चला जाणून घेऊ या! स्मरणशक्ती कशी वाढवावी’, ‘घर’, ‘हृदयविकार निवारण’,

‘निरामय यशासाठी ध्यान’, ‘सांधा बदलताना’, ‘वसुदेवे नेला कृष्ण’, या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७७५/- । सवलत किंमत १०८९/-**

**२ सप्टेंबर - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**

‘अर्थाच्या शोधात’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२०/-**

**५ सप्टेंबर - जागतिक शिक्षक दिन**

‘टू सर, विथ लव्ह’, ‘चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स’, ‘स्टोन्स इन्टू स्कूल्स’, ‘थ्री कप्स ऑफ टी’, ‘मी मलाला’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १४३५/- । सवलत किंमत ८१९/-**

**६ सप्टेंबर - नितीन बापट यांचा जन्मदिन**

‘आंधळा न्याय’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**१० सप्टेंबर - डॉ. एम. बी. कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘शब्दचर्चा’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २७९/-**

**१० सप्टेंबर - नील डोनाल्ड वॉल्श यांचा जन्मदिन**

‘संवाद परमेश्वराशी - भाग २’, ‘संवाद परमेश्वराशी - भाग ३’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ५२९/-**

**१० सप्टेंबर - विजया जहागिरदार यांचा जन्मदिन**

‘कर्मयोगिनी (इंग्लिश)’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २७९/-**

‘कर्मयोगिनी (मराठी)’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत ३२०/-**

**१० सप्टेंबर - सुनील दांडेकर यांचा जन्मदिन**

'आगमन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १८९/-**

---

**१२ सप्टेंबर - बिभूतिभूषण बॅनर्जी यांचा जन्मदिन**

'पथेर पांचाली' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

---

**१५ सप्टेंबर - दया पवार यांचा जन्मदिन**

'विटाळ', 'चावडी', 'जागल्या', 'पासंग', 'कोंडवाडा', 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६७५/- । सवलत किंमत ४७९/-**

◆



**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**


**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा**

**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**





प्रतापगडाची ऊन, वारा, पाऊस,
धुके कवटाळणारी विविध रूपे.
साक्षीला माय भवानी.



'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/08/2022 Posting Date : 11/08/2022



**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,